cmyk

## संपादकीय

### नोकरशाहीची मुजोरी की यंत्रणेतील पोकळी?

राज्यातील अल्पसंख्याक विभागाने एका दिवसात ७५ शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित केल्याचे वृत्त समोर आल्यानंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे ही कार्यवाही त्या दिवशी करण्यात आली, ज्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला होता.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२९४ शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### बिहारमध्ये मंत्र्यांसह तब्बल ४२ आमदारांसमोर नवे संकट

पाटना : बिहार विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांच्यासह ४२ आमदारांना हायकोर्टात हजर राहावे लागणार आहे. प्रेम कुमार यांच्यासह ४२ आमदारांना हायकोर्टाने नोटीस जारी केली आहे. ही नोटीस मिळणाऱ्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमधील आमदारांचा समावेश आहे. यात ऊर्जा मंत्री विजेंद्र प्रसाद यादव यांचेही नाव आहे. पाटना हायकोर्टाने ही नोटीस निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना दिली आहे. कोर्टाने या सर्व ४२ आमदारांना या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. इतकेच नाही तर याचिकेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोर्टाने सर्व ४२ आमदारांना दिलेल्या मुदतीतच नोटिशीला उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

### होमिओपॅथी कॉलेजबाबत हायकोर्टाचा निर्णय

अहमदाबाद: महाविद्यालयाच्या मान्यतेवरून सुरू असलेल्या न्यायालयीन वादामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल गुजरात उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच होमिओपॅथी डॉक्टरांच्या पदवी, प्रॅक्टिसचा परवाना मान्यता नाकरता येणार नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पारुल युनिव्हर्सिटीसह इतर शैक्षणिक संस्थांनी केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाविरुद्ध याचिका दाखल केल्या होत्या. होमिओपॅथी सेंट्रल कौन्सिलचा अनुकूल तपासणी अहवाल असतानाही, मंत्रालयाने २०१६-१७ शैक्षणिक वर्षासाठी या कॉलेजांची मान्यता नाकारली होती. २०१३ च्या नियमावलीनुसार काही त्रुटी असल्याचे कारण मंत्रालयाने दिले होते.मात्र, २०१६ मध्ये न्यायालयाने एका अंतरिम आदेशाद्वारे या महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रिया राबवण्यास परवानगी दिली होती.

### पर्यावरण तज्ञांनी कृषी क्षेत्राकडेही लक्ष द्यावे

मुंबई: कृषी क्षेत्रातील रसायनांच्या वाढत्या वापरामुळे शेती बरोबरच पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम घातक आहेत. त्यामुळे एकूणच पर्यावरण तर प्रदूषित होतच आहे, शिवाय गंभीर आजारांचे संकटही वाढत आहे. त्यामुळे पर्यावरण तज्ज्ञांनी जागतिक पर्यावरण रक्षणाचा विचार करताना कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही विचार करावा, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या 'मुंबई क्लायमेट वीक'च्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबईच्या महापौर रितू तावडे, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्थी, प्रोजेक्ट मुंबईचे शिशिर जोशी, जलज दानी आणि पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.

### विमानात गोंधळ घातल्यास ३० दिवसांची बंदी

नवी दिल्ली: विमानात गैरवर्तन करणाऱ्या प्रवाशांना एअरलाइन्स आता थेट ३० दिवसांसाठी बंदी घालू शकतील. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) गोंधळ घालणाऱ्या प्रवाशांना हाताळण्यासाठी कठोर नियमावली सुचवली आहे. नवीन प्रस्तावात सर्व एअरलाइन्सना प्रवाशांवर थेट कारवाई करण्याचे अधिकार देत आहे. सध्याच्या नियमांनुसार, विमानात गोंधळ घालणाऱ्या प्रवाशांची तक्रार आल्यास आधी चौकशी समिती स्थापन केली जात होती. या काळात एअरलाइन्सना प्रवाशांवर ४५ दिवसांपर्यंत बंदी घालण्याची परवानगी मिळत होती. परंतु नवीन नियमांनुसार चौकशी समितीची गरज नाही.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१८ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२२.५० क्विंटल | २,०५१ | २,८७० | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड : ९७.५० क्विंटल | ३४० | ४,६०० | ३,३३६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०२.०० क्विंटल | ६,४०० | ७,८८० | ७,४९३ |
| उडीद : २४.०० क्विंटल | ६,४०१ | ६,४१५ | ६,४१० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,०६० | ३,१३३ | २,७१५ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ३९.५० क्विंटल | ५,२०० | ५,३०० | ५,२५० |
| हरभरा: ३२.०० क्विंटल | ५,००० | ५,०८० | ५,०२९ |

# राज्यातील कांदा उत्पादकांचा आमरण उपोषणाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावाच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेतली असून शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २३ फेब्रुवारीपासून कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आमरण उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे.**

बाजारात कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात कोसळल्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक फटका बसत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव मात्र तळाला गेल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.



कांद्याला किमान ३००० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव

जाहीर करावा, तसेच यापूर्वी कमी दरात विक्री झालेल्या कांद्याला प्रतिक्विंटल १५०० रुपये अनुदान तात्काळ द्यावे, ही प्रमुख मागणी शेतकरी संघटनांनी पुढे केली आहे. अनेक शेतकऱ्यांनी खर्चाच्या तुलनेत निम्म्याहून कमी दरात कांदा विक्री केल्याने कर्जाचा बोजा वाढला आहे. साठवणूक, मजुरी, वाहतूक आणि औषधखतांच्या वाढलेल्या दरांमुळे उत्पादन खर्च गगनाला भिडला असताना बाजारातील दर मात्र समाधानकारक नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. याशिवाय बाजार समित्यांमधील खरेदीची गती वाढवावी, हमीभावात खरेदीची मर्यादा वाढवून सर्व शेतकऱ्यांना लाभ द्यावा, तसेच कांदा निर्यातीवरील निर्बंध शिथिल करावेत, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. निर्यातबंदी व इतर निर्बंधांमुळे देशांतर्गत बाजारात कांद्याची आवक वाढून दर आणखी कोसळल्याचा आरोप शेतकरी नेत्यांनी केला आहे. शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. २३ फेब्रुवारीपासून सुरू ▶▶ पान २ वर

# आजपासून दहावीची परिक्षा

## ६ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले परिक्षेला

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात आज शुक्रवारपासून दहावीची परिक्षा सुरू होत असून, यंदा राज्यभरातून एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी बसणार आहेत. मंडळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार या परीक्षेसाठी मुलांची संख्या ८ लाख ६५ हजार ७४०, तर मुलींची संख्या ७ लाख ४९ हजार ७३६ इतकी आहे. याशिवाय १३ ट्रान्सजेंडर विद्यार्थी देखील परीक्षेला बसणार असल्याची नोंद मंडळाने केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या ३ हजार ८७९ ने वाढली आहे. यात मुलांची संख्या १,६३० ने वाढली असून मुलींची संख्या २ हजाराने २५५ ने वाढली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा शुक्रवार, २० फेब्रुवारी ते बुधवार, १८ मार्च या कालावधीत राज्यभर आयोजित करण्यात आली आहे. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी राज्यातील २३ हजार ६८३ शाळांमधून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.



त्यामध्ये ८ लाख ६५ हजार ७४० मुले, ७ लाख ४९ हजार ७३६ मुली आणि १३ ट्रान्सजेंडर विद्यार्थी आहेत. राज्यात ही परीक्षा ५ हजार १११ मुख्य केंद्रांवर होणार आहे. विभागनिहाय पाहता मुंबई विभागात सर्वाधिक ३ लाख ४९ हजार ८७३ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. राज्यातील सर्व विभागांमध्ये ही संख्या सर्वाधिक आहे. १ लाख ८२ हजार ८०८ मुले आणि १ लाख ६७ हजार ६६१ मुली परीक्षेला बसणार आहेत. तसेच ४ ट्रान्सजेंडर विद्यार्थी देखील परीक्षेसाठी ▶▶ पान २ वर

## अरबी समुद्रातील शिवस्मारक होईल, असे वाटत नाही-संभाजीराजे छत्रपती

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

आता अरबी समुद्रातील शिवस्मारक होईल, असे मला वाटत नाही. हे शिवस्मारक व्हावे यासाठी मोठे आंदोलन केले. मात्र परवानग्यांचे दाखले देत पुढे काहीच होत नाही, असे म्हणत संभाजीराजे छत्रपती यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच राज्यातील किल्ले संवर्धनासाठी ज्या प्रमाणात मदत अपेक्षित आहे त्या प्रमाणात सरकारची मदत होत नाही असेही ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवाच्या कार्यक्रमासाठी संभाजीराजे छत्रपती दिल्लीत होते. यादरम्यान बोलताना ते म्हणाले की,



राज्यात आणि केंद्रात एकाच पक्षाचे सरकार आहे. तरीही परवानग्या मिळत नाही ही सबब दिली जाते. त्यामुळे सरकारने याबाबत स्पष्टता द्यावी. एक तर शिवस्मारक करावे किंवा काय करणार आहेत, याबद्दल राज्याला सांगावे, असेही ते म्हणाले. ▶▶ पान २ वर

# रेवडी धोरण बंद करा!

## अनेक राज्ये तोट्यात; मोफत खैरात वाटपावर सुप्रीम कोर्टाचे ताशेरे



नवी दिल्ली । वृत्तसंस्थस

मोफत खैरात वाटपावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत. मोफत योजनांमुळे अनेक राज्यातील सरकारवर कर्जाचा बोझा वाढला असून उत्पन्नही घटले आहे यावरून सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. कर्ज वाढत असतानाही मोफत योजना वाटल्या जात आहेत. याऐवजी रोजगार निर्मितीवर जास्त भर देणे आवश्यक आहे असे कोर्टाने म्हटले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने ही महत्त्वाची टिप्पणी केली आहे. ▶▶ पान २ वर

### निवडणुकीपूर्वीच अशा घोषणा का ?

आम्ही फक्त तामिळनाडू पुरते बोलत नाही. निवडणुकीपूर्वीच अशा घोषणा का केल्या जातात हा आमचा प्रश्न आहे. यावर सर्व राजकीय पक्ष, समाजसेवक आणि विचारवंतांनी विचार करण्याची गरज आहे. हे कधीपर्यंत सुरू राहील. राज्य तोट्यात जात आहे तरीही मोफत खैरात दिली जाते. जर तुम्ही एका वर्षांत २५ टक्के महसूल जमा करता, तर त्याचा वापर राज्यातील विकासासाठी का केला जाऊ शकत नाही असा सवालही सरन्यायाधीशांनी सुनावणी वेळी विचारला आहे.

# अजितदादांच्या विमान अपघाताचे गूढ उलगडणार?

## डेटा रेकॉर्डरबाबत महत्वाची माहिती समोर

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघाताबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. तपास यंत्रणांनी विमानातील डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर यशस्वीरीत्या डाउनलोड केल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे अपघाताच्या क्षणी विमानाची गती, उंची, तांत्रिक स्थिती आणि पायलटच्या हालचालींबाबतची अचूक माहिती उपलब्ध होणार आहे. प्राथमिक अहवाल २८ फेब्रुवारीपूर्वी सादर होण्याची शक्यता




व्यक्त केली जात आहे. दरम्यान, कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर उष्णतेमुळे काही ▶▶ पान २ वर

# रंजना नागपूरकर यांचे आरोप फड पिता-पुत्रांनी फेटाळले; ओळख नसल्याचा दिला निर्वाळा

परळी प्रतिनिधी

नागपूर येथील रंजना नागपूरकर नामक महिलेने आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर परळीतील कैलास व निखिल फड या पिता- पुत्रांनी स्वतःहून माध्यमांच्या समोर येत संबंधित महिलेचे आरोप फेटाळून लावले आहेत. सदरील महिलेला आपण ओळखत नाही, कधीही भेटलेलो नाही, कोणत्याही प्रकारे आपली व त्यांची भेट किंवा संवाद झालेला नाही, तरीही त्या आर्थिक गैरव्यवहार आणि बंदूक दाखवून धमकी दिल्याचा करत असलेला आरोप संपूर्णतः खोटा व तथ्यहीन असून,



आपण मागील दहा वर्षांत कधी नागपूरला गेलो सुद्धा नाहीत. त्याचबरोबर संबंधित महिलेने सांगितलेला घटनाक्रम, त्यातील स्थळे व तारखा पाहून त्यांचे व आमचे कॉल डिटेल्स व मोबाईल लोकेशन काढावेत, संबंधित प्रकरणाचा व आमचा किंवा आ. धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नाही, किंवा कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी आपण ▶▶ पान २ वर

## भिवंडीचा महापौर सेक्युलर फ्रंट बनवणार-हर्षवर्धन सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी

भिवंडी महानगरपालिका निवडणूक कॉँग्रेस पक्षाने स्वबळावर लढवली व सर्वात जास्त ३० नगरसेवक विजयी झाले. राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या १२ नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला, पण बहुमतासाठी आणखी ४ नगरसेवकांची आवश्यकता होती. भाजपा व शिंदेसेना यांच्यासोबत जायचे नाही ही कॉँग्रेसची भूमिका आहे त्या भूमिकेशी कॉँग्रेसने तडजोड केली नाही. आता भाजपाचे काही नगरसेवक पक्षाचा आणि विचारांचा त्याग करून धर्मनिरपेक्ष आघाडीत सहभागी झाले असून भिवंडीचा महापौर व उपमहापौर सेक्युलर फ्रंटचा होईल, असा विश्वास कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

# ११ लाखांची कुस्ती वादात!

## सिकंदर शेखवर समर्थकाचा हात उचलण्याचा प्रयत्न; पुण्याच्या आखाड्यात राडा

पुणे । प्रतिनिधी

**मुळशीतील पौड येथे आयोजित कुस्ती स्पर्धेत अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'महाराष्ट्र केसरी' सिकंदर शेख आणि माऊली कोकाटे यांच्यातील ११ लाखांच्या इनामी कुस्ती दरम्यान एका समर्थकाने थेट आखाड्यात घुसून सिकंदरवर हात उचलण्याचा प्रयत्न केल्याने मैदानात एकच खळबळ उडाली.**



महाशिवरात्री उत्सवानिमित्त पौड येथे 'मल्लिकार्जुन कुस्ती किताब' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील मुख्य आकर्षण होते सिकंदर शेख विरुद्ध माऊली कोकाटे. आयोजकांनी ही कुस्ती 'निकाली'च होणार असे जाहीर केल्याने दोन्ही पैलवान विजयासाठी जीव तोडून लढत होते. हजारो कुस्तीप्रेमींच्या उपस्थितीत ▶▶ पान २ वर

### गुरूंची मध्यस्थी आणि वादावर पडदा

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून सिकंदरचे गुरू विशाल हारगुले यांनी तातडीने आखाड्यात उडी घेतली. त्यांनी दोन्ही पैलवानांना शांत केले आणि वातावरण निवळण्याचा प्रयत्न केला. या घटनेचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. भरपूर वेळ होऊनही आणि आखाड्यात झालेल्या राड्यामुळे कुस्ती निकाली होणे कठीण झाले होते. अखेर आयोजकांनी आणि पंचांनी वादावर पडदा टाकण्यासाठी मध्यममार्ग स्वीकारला. ही कुस्ती बरोबरीने सोडवण्यात आली.

## अमृता फडणवीस यांचा बँकिंग क्षेत्राला रामराम

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी बँकिंग क्षेत्रातील आपल्या दीर्घकालीन कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. त्यांनी ॲक्सिस बँकमधील आपल्या वरिष्ठ पदाचा स्वेच्छेने राजीनामा दिला आहे. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्यांनी हा निर्णय घेतला आहे. अमृता फडणवीस यांनी आपल्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात नागपूर येथून केली होती. बँकिंग क्षेत्रात त्यांनी अत्यंत साध्या पदापासून आपल्या प्रवासाला प्रारंभ केला आणि आपल्या कौशल्याच्या जोरावर त्या ॲक्सिस बँकमध्ये वेस्टर्न इंडियाच्या कॉर्पोरेट हेड (उप-उपाध्यक्ष) या वरिष्ठ पदापर्यंत पोहोचल्या. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असतानाही त्यांनी आपली ही खासगी क्षेत्रातील नोकरी सुरू ठेवून स्वतःची एक वेगळी ओळख जपली होती. मात्र, आता वैयक्तिक आणि सामाजिक कारणास्तव त्यांनी या जबाबदारीतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

cmyk

अग्रलेख

# नोकरशाहीची मुजोरी की यंत्रणेतील पोकळी?

राज्यातील अल्पसंख्याक विभागाने एका दिवसात ७५ शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित केल्याचे वृत्त समोर आल्यानंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे ही कार्यवाही त्या दिवशी करण्यात आली, ज्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला होता. या प्रक्रियेला त्यांनी यापूर्वी स्थगिती दिली होती, ही बाब अधिकच गंभीर ठरते. या पार्श्वभूमीवर उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आल्याचे वृत्त आहे. परंतु केवळ चौकशी जाहीर करणे पुरेसे ठरणार नाही; प्रशासनातील जबाबदारी निश्चित होणे आणि दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटना 'अपवाद' म्हणून दाखवल्या जातील आणि प्रणालीतील दोष कायम राहतील.

एका जाहीर कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील नोकरशाही सक्षम आणि जबाबदार असल्याचे मत व्यक्त केले होते. तेव्हा उपस्थित असलेले जयंत पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी प्रशासनाविषयी सकारात्मक भूमिका मांडली होती. मात्र सध्याच्या घटनेने त्या विश्वासालाच तडा गेला आहे, असे म्हणावे लागेल. अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच ही घाईगडबडीने करण्यात आलेली कार्यवाही ही केवळ संवेदनाहीनता नाही, तर निर्णय प्रक्रियेतील शिस्तभंगाचे लक्षण आहे. प्रशासनाने राजकीय परिस्थितीचा गैरफायदा घेतला काय, हा संशय उपस्थित होतो. सुनेत्रा पवार या राजकारणात नवख्या असल्याने हे प्रकरण उघडकीस येणार नाही, अशी समजूत संबंधितांनी करून घेतली असावी का, हा प्रश्न जनमानसात निर्माण होणे स्वाभाविक आहे. शिक्षणसंस्थांना अल्पसंख्याक दर्जा का हवा असतो? यामागील तरतुदी समजून घेतल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होतात. अल्पसंख्याक दर्जा मिळालेल्या संस्थांना प्रवेश प्रक्रिया, आरक्षणाच्या अटी, व्यवस्थापनातील स्वायत्तता आणि काही आर्थिक सवलती मिळतात. या सवलतींचा उद्देश विशिष्ट समुदायाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी असला, तरी प्रत्यक्षात त्याचा लाभ विद्यार्थ्यांना आणि पालकांना कितपत होतो, हा कळीचा प्रश्न आहे. सवलतींचा लाभ संस्थेपुरता मर्यादित राहतो आणि शुल्क संरचनेत कोणतीही सुसूत्रता दिसत नाही, अशी तक्रार वारंवार पुढे येते. महागडी पायाभूत सुविधा, चकचकीत इमारती आणि आकर्षक प्रतिमा यामागे पालकांचे लक्ष वेधले जाते; पण शैक्षणिक गुणवत्तेचा कस लावला जातो का? पालकांनीही जागरूकतेने प्रश्न विचारणे गरजेचे आहे. मंत्रालयाबाहेरही 'प्रति मंत्रालय' चालते, अशी सर्वसामान्यांची धारणा आहे. उपरोक्त घटनेने त्या समजुतीला खतपाणी घातले आहे. एका यादीत एकाच शिक्षणसंस्थेच्या अनेक शाळांचा समावेश झाल्याचे नमूद केले जाते; ही बाब प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत शंका निर्माण करते. सामान्य नागरिकांना साध्या कामासाठी चकरा माराव्या लागतात, तर दुसरीकडे काही प्रस्ताव विजेच्या वेगाने मंजूर होतातही तफावतच असंतोषाला कारणीभूत ठरते. 'अनुदान नको, पण चकरा मारायला लावू नका' अशी भावना निर्माण होणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. सरकारने जाहीर केलेली चौकशी ही केवळ या एका दिवसापुरती मर्यादित राहू नये. मागील काही वर्षांत अल्पसंख्याक दर्जा मिळवलेल्या सर्व शिक्षणसंस्थांचा आढावा घेऊन त्यांनी सवलतींचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवला का? शुल्क संरचना सुसंगत आहे का? नियमांचे पालन झाले का? याचा सखोल अभ्यास व्हायला हवा. मुख्यमंत्र्यांनी एकदा नोकरशाहीला 'घोडा' संबोधून त्यावर मांड ठोकण्याची गरज व्यक्त केली होती. परंतु हा घोडा योग्य दिशेने धावेल यासाठी केवळ इशारे पुरेसे नाहीत; नियंत्रण, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांची मजबूत चौकट उभी करावी लागेल. या प्रकरणामुळे जनतेच्या मनात दोन अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. पहिली, दोषींवर ठोस आणि उदाहरणादाखल कारवाई व्हावी; आणि दुसरी, अल्पसंख्याक दर्जा देण्याची प्रक्रिया पारदर्शक, ऑनलाइन व सार्वजनिक तपासणीसाठी खुली करावी. लोकशाहीत राजकीय नेतृत्व आणि प्रशासन या दोन्ही घटकांनी जनतेच्या विश्वासाचे जतन करणे आवश्यक असते. अन्यथा 'यंत्रणा आपल्यासाठी नाही' ही भावना वाढीस लागते. अल्पसंख्याक दर्जा प्रकरण हे केवळ एका दिवसाचे किंवा एका विभागाचे प्रकरण नाही; ते राज्यकारभारातील शिस्त, संवेदनशीलता आणि पारदर्शकतेची परीक्षा आहे. सरकार या परीक्षेत किती गुण मिळवते, हे येणारा काळ ठरवेल.

# महापुरुषांनी सांगितलेले विचार आम्ही आमच्या जगण्यात उतरवले पाहिजेत-प्रा.बापुसाहेब शिंदे

## 'तुलसी समूहात' व्याख्यान, रक्तदान शिबिर आणि विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

**आजच्या काळात आपण महापुरुषांचा जयजयकार करतो, त्यांना डोक्यावर घेतो, पण त्यांचे विचार डोक्यात घेत नाही. जोपर्यंत महापुरुषांचे विचार आपल्या आचरणात येत नाहीत, तोपर्यंत आपले डोके सुपीक होणार नाही आणि खऱ्या अर्थाने समाजाचे परिवर्तन घडणार नाही, असे परखड मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा. बापुसाहेब शिंदे यांनी व्यक्त केले.**

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने गुरुवार, दि. १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात' भव्य व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, इंजि. रविंद्र कोलप तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. विजयकुमार बांदल, प्रा. डी.डी. राऊत, प्रा. प्रकाश ढोकणे आणि आयु. उमा जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महापुरुषांच्या कार्याची सांगड घालताना प्रा. शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात एक 'गुरु-शिष्य' नाते होते. शिवरायांनी स्त्रियांना समाजात सन्मान मिळवून दिला, महात्मा फुलेंनी त्यांना शिक्षण दिले, तर डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून कायद्याचे अधिकार प्राप्त करून दिले. या तिन्ही महापुरुषांच्या विचारांचा संदेश आपल्या दैनंदिन जीवनात उतरवणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. पुढे राजमाता जिजाऊंच्या योगदानाबद्दल बोलताना प्रा. शिंदे म्हणाले की, पावणे चारशे वर्षांपूर्वी जेव्हा देशात मुघलशाही, आदिलशाही आणि निजामशाहीचे वर्चस्व होते, अशा कठीण परिस्थितीत राजमाता जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले. ''जोपर्यंत महिला आत्मनिर्भर होत नाहीत, तोपर्यंत त्यांना समाजात सन्मान मिळणार नाही,'' हा जिजाऊंचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक स्त्रीला स्वावलंबी करणे हेच या महामातांचे ध्येय होते, असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांनी संस्थेच्या ध्येयधोरणांवर प्रकाश टाकत म्हटले की, महापुरुषांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सक्षम पिढी निर्माण करणे हे संस्थेचे मुख्य उद्देश आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, जर तुम्हाला तुमच्या स्वप्नांना वास्तवात बदलायचे असेल, तर महान व्यक्तींच्या जीवनकथांचा अभ्यास करा. त्यातून प्रेरणा आणि ऊर्जा मिळेल, आणि तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग स्पष्ट होईल.जसे छत्रपती शिवाजी महाराज यांनी धैर्य आणि रणनीतीने शत्रूंचा पराभव केला, तसे तुम्हालाही चिकाटीने तुमचे उद्दिष्ट साध्य करता येईल, असे सांगितले. यावेळी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला पुस्तके भेट देऊन नवा आदर्श निर्माण केला. यानंतर शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे व विद्यार्थ्यांनी केले. तर आभार प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल यांनी मानले. यावेळी तुलसी समूहातील प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जायकवाडी पाणीप्रश्नासाठी संवाद बैठकीस शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे; लोकलढा समन्वयकांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**जायकवाडी धरणाचे पाणी बीड जिल्ह्यातील वंचित भागातील शेतीला मिळावे यासाठी गेल्या दोन वर्षांपासून लोकलढा आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाची महत्वाची वार्षिक बैठक शनिवार (दि. २१) रोजी सांकाळी सहा वा. शृंगऋषीगड (शृंगारवाडी, ता. शिरूर) येथे आयोजित केली आहे. या संवाद बैठकीस शेतकऱ्यांसह विविध क्षेत्रातील जाणकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी केले आहे.**

बीड जिल्ह्यातील पाच लाख एकरपेक्षा अधिक जमीनीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळत नाही. यामुळे शेतकऱ्यांना फळपीक, ऊस व बारमाही बागायत जमीन कसता येत नाही. बीड जिल्ह्यात दर तीन चार वर्षांने भीषण दुष्काळ पडतो. यामुळे फळपीक उत्पादन घेणारा व ऊस पीक घेणारा शेतकरी उध्वस्त होतो. बागायत जमीन नसल्याने शेतकरी मजुरांना पुरेसा रोजगारही उपलब्ध नसतो, परिणामी मजुरांना ऊसतोडणीसाठी स्थलांतर करावे लागते. शेतीला बारमाही पाणी नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात जाऊन शेतकरी आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा एक ना अनेक समस्यांवर मात करण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी आवश्यक आहे. यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या शेतकऱ्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री संजय राठोड, खासदार, आमदार, जलसंपदा सचिव यांची भेट घेत जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे अशी मागणी केली आहे. जायकवाडी धरणाचे पाणी बीड जिल्ह्यातील वंचित भागाला मिळावे, गोदावरी-सिंदफणा नदीजोड व उपकालवा यासाठी सर्वे करण्याचे पत्र कार्यकारी अभियंता बीड यांनी वरिष्ठांना दिले आहे. या पत्रानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्य कार्यकारी अभियंता संभाजीनगर यांना दिल्या आहेत. असे असले तरी प्रशासनाने या कामास सुरुवात केली नाही. यासह इतर विषयांवर चर्चा करण्यासाठी शनिवारी या वार्षिक संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीमध्ये लोकलढा आंदोलनाने दोन वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. या बैठकीत पाटपाणी विभागातील तज्ज्ञ, शेतकरी चळवळीतील जाणकार, अनुभवी शेतकरी मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीस १४० गावासह बीड जिल्ह्यातील शेतकर्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी केले आहे.



**बीड : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती बीड शहरकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे शासकीय महापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतिषकुमार सोळंके यांच्यासह शासकीय अधिकारी तसेच हजारो शिवप्रेमी उपस्थित होते.**



**बीड : अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील शिवतीर्थ येथे जाऊन भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी अभिवादन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# बोरफडी येथे आज सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू येणार

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानअंतर्गत कार्यक्रमास उपस्थित रहा-सरपंच कैलास घुगे

**बीड । प्रतिनिधी**

**गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्रचार व प्रसिद्धीसाठी मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू आज (दि.२०) सकाळी १० वाजता बीड तालुक्यातील बोरफडी येथे भेट देणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन बोरफडी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच कैलास घुगे आणि ग्रामपंचायत सदस्यांनी केले आहे.**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे तसेच गटविकास अधिकारी अनिकेत सानप उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमादरम्यान विविध विकासकामांची पाहणी तसेच नवीन कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या अभियानामुळे ग्रामविकासाच्या योजनांना अधिक गती मिळणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सरपंच कैलास घुगे यांनी केले आहे.

### कैलास घुगे यांनी केला गावाचा कायापालट

बोरफडीचे सरपंच कैलास घुगे यांच्या नेतृत्वाखाली गावातील प्रत्येक वस्तीपर्यंत रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधा पोहोचविण्यात आल्या आहेत. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून अंगणवाडी, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे. गावात अनेक ठिकाणी आसन व्यवस्था, उद्यान निर्मिती, वृक्षलागवड तसेच जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहेत. या सर्व उपक्रमांमुळे बोरफडी हे गाव आदर्श गाव म्हणून नावारूपाला येत आहे.

# पान १ वरून...

### राज्यातील कांदा उत्पादकांचा

होणारे उपोषण हे राज्यव्यापी आंदोलनाचे रूप धारण करू शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे. कांदा उत्पादकांच्या मागण्यांवर शासनाची काय भूमिका राहते, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

--------------

### अरबी समुद्रातील शिवस्मारक होईल,

राज्यातील गडकिल्ले संवर्धनाबाबत बोलताना संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, रायगड विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून दुर्गराज रायगडाचे संवर्धन आणि विकास कामे सुरू आहेत. या कामांमध्ये सरकारची मदत होत आहे मात्र ज्या प्रमाणात मदत अपेक्षित आहे, तशी होत नाही. १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून जाहीर करण्यात आले मात्र त्यापैकी केवळ रायगड किल्ल्यावर काम सुरू आहे. इतरही किल्ल्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे, असे ते म्हणालन झाले पाहिजे. राज्यात सी फोर्ट सर्किट टुरिझम होणे आवश्यक आहे. याद्वारे ज्या किल्ल्यांनी महाराष्ट्राला आणि देशाला वाचवले ते अप्रतिम किल्ले देश विदेशातील लोक बघू शकतील, असेही संभाजीराजे छत्रपती यांनी सांगितले.

--------------

### आजपासून दहावीची

नोंदणी केली आहे. मुंबई विभागात १ हजार ४ केंद्रे असतील. तसेच तेवढेच केंद्र संचालक या केंद्रांची जबाबदारी सांभाळणार आहेत. या केंद्रांमध्ये प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका पोहोचवण्यासाठी ७१ कस्टडी असतील. गेल्या वर्षीच्या अनुभवानुसार मुंबई विभागात दहावीसाठी एक केंद्र संवेदनशील जाहीर करण्यात आले आहे. परीक्षा सुरळीत व पारदर्शक पार पाडण्यासाठी मंडळाने कॉपीमुक्त अभियान राबविले आहे. बहुतांश केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवण्यात येणार असून संशयित गैरप्रकारांवर तातडीने कारवाई केली जाणार आहे. जिल्हानिहाय दक्षता पथके नियुक्त करण्यात आली आहेत. परीक्षा केंद्रांभोवती ४०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याचे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दहावीचा पहिला पेपर मराठी प्रथम भाषेचा होणार आहे.

------------

### अजितदादांच्या विमान

प्रमाणात नुकसानग्रस्त झाल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे तांत्रिक तज्ज्ञांकडून त्यातील माहिती पुनर्प्राप्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बारामतीजवळ झालेल्या या दुर्घटनेत अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला होता. हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. या अपघाताबाबत आमदार रोहित पवार आणि अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. रोहित पवार यांनी दोन पत्रकार परिषद घेत अनेक प्रश्न उपस्थित केले, तर जय पवार यांनी सोशल मीडियावर निष्पक्ष चौकशीची मागणी केली. संबंधित विमान कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. २८ जानेवारी रोजी अजित पवार मुंबईहून बारामतीकडे प्रचार सभांसाठी निघाले होते. मात्र बारामती विमानतळाजवळ त्यांचे विमान कोसळले. या दुर्घटनेने संपूर्ण राज्याला हादरा बसला असून राजकीय वर्तुळातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आता डिजिटल डेटा रेकॉर्डरमधील माहितीच्या आधारे अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्राथमिक अहवालाकडे लागले आहे.

------------

### रंजना नागपूरकर यांचे आरोप

तयार असून, चौकशीत दोषी आढळलो, तर द्याल ती शिक्षा भोगायला तयार आहे, असे आवाहन परळीतील फड पिता पुत्रांनी केले आहे. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्यासह काही आजी - माजी मंत्री व पुढाऱ्यांचे नाव घेऊन पोलिस कर्मचारी असलेल्या आपल्या पतीला पोलिस चौकशीपासून वाचवण्यासाठी आपण मंत्रालयातील काही अधिकारी, माजी मंत्री तसेच फड पिता पुत्रांसह अनेकांची नावे रंजना नागपूरकर यांनी घेतली होती. तसेच आपली फसवणूक झाली असून, पैसे परत मागायला गेले असता फड पिता- पुत्रांनी आपल्याला बंदूक दाखवून भीती घातली व जीवे मारण्याची धमकी देऊन हाकलून दिले, असाही आरोप केला होता. मात्र फड पिता पुत्रांनी हे आरोप फेटाळून लावत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबत सखोल चौकशी करण्याचे आवाहन केले आहे. सदर महिला रंजना नागपूरकर यांची आपली ओळख नाही, कधीही भेट किंवा संवाद झालेला नाही, मग आम्ही बंदूक कधी दाखवली? त्या जो घटनाक्रम आणि तारखा सांगत आहेत, त्याप्रमाणे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी करून आमचे कॉल डिटेल्स, लोकेशन सर्व काढावेत, आमचा दोष आढळला तर आम्ही द्याल ती शिक्षा भोगू, असे म्हणत फड पिता पुत्रांनी आपल्याला व आपल्या आडून धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट केल्याचा गंभीर आरोप केला आहे. दरम्यान, एका विशिष्ट जातीचे असल्याने मागील काही दिवसांपासून आम्हाला सतत टार्गेट केले जात असून आमच्या आडून धनंजय मुंडे यांची देखील बदनामी केली जात आहे. बीड व नागपूर पोलिस अधीक्षक यांना आम्ही या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची विनंती करत आहोत. आम्ही सर्व प्रकारच्या चौकशीसाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्यासाठी तयार आहोत. मात्र संबंधित महिलेने केलेले आरोप धादांत खोटे व बदनामी कारक असल्याने त्यांच्या विरोधात कायदेशीर अब्रु नुकसानीचा दावा देखील दाखल करणार असल्याचे निखिल फड व त्याचे पिता कैलास फड यांनी म्हटले आहे.

--------

### ११ लाखांची कुस्ती

ही लढत तब्बल एक तास सुरू होती. तासभराच्या झुंजीत दोन्ही पैलवान थकले होते, मात्र चुरस कायम होती. कुस्ती दरम्यान माऊली कोकाटेने आक्रमक होत सिकंदरच्या मानेवर प्रहार (थपडा) मारण्यास सुरुवात केली. या प्रकारामुळे सिकंदरचा संयम सुटला आणि दोघांमध्ये बाचाबाची सुरू झाली. हा वाद सुरू असतानाच, आखाड्याच्या कडेला असलेल्या माऊली जमदाडेच्या एका समर्थकाने अचानक मैदानात धाव घेतली. काही समजण्याच्या आतच त्याने थेट सिकंदर शेखवर हात उचलण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पाहून मैदानात गोंधळ उडाला आणि प्रेक्षकांमधून संताप व्यक्त होऊ लागला.

---------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

## गोलंदाजांनी वर्चस्व सिद्ध केलंय,फलंदाजी पण बहरेल

युएसए विरुद्ध सूर्यकमार यादव, नामीबिया विरुद्ध हार्दिक पांड्या, पाकिस्तान विरुद्ध ईशान किशन तर नेदरलँड विरुद्ध शिवम दुबे असे चार सामन्यात चार भारतीय खेळाडू विजयाचे शिल्पकार अर्थात सामनावीर ठरले. भारतीय संघ कुणा एका खेळाडूवर अवलंबून नसल्याचे लक्षण आहे . हे खरे आहे की पाकिस्तान विरुद्धचा सामना सोडला तर भारतीय संघाचा प्रत्येक सामना हा अटीतटीचा आणि भारतीय फलंदाजांची परीक्षा पाहणारा झाला. अभिषेक शर्मा हा लागोपाठ आश्चर्य कार्यकर्त्या तीन




वेळा शून्यावर बाद झाला हे भारतासाठी अनपेक्षित आणि धक्कादायक होते पण त्यातूनही संपूर्ण भारतीय संघाची फलंदाजी कधीच कोलमडली नाही. पहिल्या सामन्यात मोठ्या पडझडीनंतर सूर्यकुमार यादवने नाबाद राहत किल्ला लढवला आणि नुसता लढवलाच नाही तर भारताला जिंकण्यासाठी पुरेशा धावा रचून दिल्या .अन्य दोन सामन्यातही असेच झाले. हार्दिक पांड्या आणि ईशान किशन फलंदाजीची बाजू नुसती सावरलीच नाही तर भारताला सन्मानजनक धावसंख्या रचून दिली. कालचा नेदरलँड विरुद्ध भारताचा सामना हा सुपरहिट मधील प्रवेश निश्चित झाल्या नंतरचा सामना होता. हा सामना भारत एकतर्फी जिंकेल आणि या सामन्यात मोठी धावसंख्या रुचेल असे वाटले होते मात्र अभिषेक शर्मा पुन्हा शून्यावर परतल्यानंतर आणि नेदरलँडच्या गोलंदाजांनी आणि क्षेत्ररक्षकांनी टिच्चून खेळ केल्यामुळे भारतीय फलंदाजांना मुक्तपणे धावा करता आल्या नाहीत, एवढेच नव्हे तर मोठ्या धावसंख्येसाठी शिवम दुबे ,हार्दिक पांड्या आणि रिंकू सिंग यांच्यावर विसंबून राहावे लागले. एकंदर चारही सामन्यातील फलंदाजीचा आढावा घेतला तर या स्पर्धेपूर्वी न्युझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या विरुद्ध भारतीय फलंदाजांनी जी धावांची सहजपणे लय लूट केली तसे काही झाले नाही .अर्थात विश्वकप क्रिकेट स्पर्धा दबाव निर्माण करणारी असते आणि या चा मोठा परिणाम नक्कीच या चार सामन्यांमध्ये दिसून आला. आता पुढचे सामने दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडीज आणि झिंबाब्वे या संघाविरुद्ध असणार आहेत यातील दक्षिण आफ्रिकेला आपण अलीकडेच पराभूत केले आहे पण वेस्टइंडीज आणि झिंबाब्वेच्या विरुद्ध फारसे खेळलो नाही, त्यात झिंबाब्वेने ऑस्ट्रेलिया सारख्या बलाढ्य संघाला घरचा रस्ता दाखवला असल्याने त्यांचे मनोबल उंचावले आहे. वेस्ट इंडिजचा संघ हा बेडर खेळाडूंचा संघ म्हणून ओळखला जातो तर दक्षिण आफ्रिका हा संघ बलाढ्य असला तरी या आधीच्या विश्वकप स्पर्धेच्या फायनलमध्ये त्यांनी आपल्याला चांगलेच झुंजवलेले आहे. या पार्श्वभूमीवर सुपरहिट मधील सामने आपल्याला खेळायचे आहेत आपली गोलंदाजीची बाजू भक्कम आहे, भारतीय फलंदाजांनी ज्या धावा केल्या त्याला आपल्या परिपूर्ण गोलंदाजीने संपूर्ण संरक्षण दिले आहे .आता भारतीय फलंदाजांना आपल्या क्षमतेनुसार अतिशय उच्च दर्जाचा खेळ दाखवावा लागेल .आपण पुन्हा विश्वविजेते होऊ याची आम्हा सर्व भारतीयांना खात्री आहे.



**– महेश वाघमारे, बीड.**

# भिगवण येथील हिंदु मुलीच्या अपहरणाचा निषेध

### प्रकरणाची चौकशी करून समाज कंटकांवर कठोर कारवाई करा; सकल हिंदु समाजाची पोलिसांकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

भिगवण येथे कटरपंती जिहाद्यांकडुन शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हिंदू समाजाच्या मुलीला भर रस्त्यातून मोटारसायकलवर जात असतांना आई व भावाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकुन अपहरण केलेल्या घटनेचा निषेध करत या प्रकरणाची सखल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सकल हिंदु समाजाच्या वतीने शहर पोलिस प्रशासनाकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कट्टरपंती जिहाद्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंतीचा पूर्वसंध्येला हिंदू समाजाच्या मुलीला भर रस्त्यातून मोटरसायकलवर जात असताना आई व भावाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून आपहरन केले आहे या घटनेचा माजलगाव हिंदू समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येतो व या प्रकरणाची सकल चौकशी करून दोषींवर कठोरात



कठोर कार्यवाही करावी,भर दिवसा घडलेली ही घटना प्रशासनाच्या कायद्याचा व स्त्रियांच्या संरक्षणाबद्दल खूप मोठा प्रश्न निर्माण करणारे आहे.? सदरील घटनेमुळे महिलांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे, भर दिवसा रस्त्यावरून जर गाडी अडून अशाप्रकारे अपहरण शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात होत असेल तर महाराष्ट्रात महिला सुरक्षित आहेत का हा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे, तरी प्रशासनाने सदरील घटनेची लवकरात लवकर तपासणी करून योग्य ती कारवाई करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी सकल हिंदु समाजाच्या वतीने शहर पोलिस प्रशासनाकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. निवेदनावर भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, अरूण राउत, उपसभापती श्रीहरी मोरे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले,अविनाश कांडुरे, विशाल देवकते, मनोज कोरडे, रामप्रसाद सावंत, अजिंक्य गायके, अशोक तिडके, ज्ञानेश्वर सरवदे, राजेश जाधव राम आबुज, अतुल उगले, सतीश जोशी, शरद कचरे, प्रल्हाद दळवी संतोष देवकते पवन मोगरेकर भागवत गायकवाड पंडित भुतकर सुभाष साळवे, अजय बादाडे, संतोष जाधव, सुभाष कांबळे, नानासाहेब घोडके, रमेश जाधव, दिपक मेंडके, दीपक अलकुंटे दत्ता महाजन, पुरूषोत्तम गायकवाड, मयुर वाघमारे, सुनिल होके,यशराज जगताप तात्या पांचाळ, शेख फोरोज यांचेसह अनेक समाजाबांधवांच्या स्वाक्ष-या आहेत.

# अमित राठोडची विझी क्रिकेट ट्रॉफीसाठी निवड

### पश्चिम विभागीय विद्यापीठ संघात फलंदाज म्हणून संधी; गोव्यात होणाऱ्या स्पर्धेसाठी तयारी सुरू

**बीड । प्रतिनिधी**

**सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट येथे पार पडलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेनंतर पश्चिम विभागीय विद्यापीठ क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या संघातून खेळणाऱ्या सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या क्रिकेटपटू अमित राठोड याची फलंदाज म्हणून निवड झाली आहे.**



अमित राठोडने स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजी करत आपल्या कामगिरीच्या जोरावर पश्चिम विभागीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले आहे. पुढील स्पर्धेच्या तयारीसाठी तो सध्या सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट येथे आयोजित सराव शिबिरात सहभागी झाला आहे.

२८ फेब्रुवारीपासून गोवा येथे विझी क्रिकेट ट्रॉफी स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून, ही आंतरविभागीय विद्यापीठ एकदिवसीय पुरुष क्रिकेट स्पर्धा आहे. अखिल भारतीय विद्यापीठ खेळ संघटना () व भारतीय क्रिकेट नियामक मंडळ () यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. विद्यापीठ स्तरावरील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर संधी मिळवून देण्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाचे व्यासपीठ मानली जाते. देशातील उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम अशा चार विभागीय विद्यापीठ संघांमध्ये सामने खेळवले जातात. ही स्पर्धा गोवा क्रिकेट असोसिएशन अकादमी, पोरवोरिम तसेच पणजी जिमखाना मैदान, पणजी येथे होणार आहे. अमित राठोडच्या या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर, सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संचालक तथा नगरसेविका डॉ. सारिका क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. अन्सरउल्ला खान, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप तसेच शारीरिक शिक्षण विभागातील डॉ. शेख शकील, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, डॉ. प्रियंका नवले, डॉ. अमृतसिंग बीसेन, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी-खेळाडूंनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रमजानमध्ये माध्यमाधारित भेदभाव नको; सर्व शिक्षकांना समान सवलत देण्याबाबतचा तात्काळ पूरक आदेश निर्गमित करण्याची मागणी – कास्ट्राईब

माजलगाव । प्रतिनिधी

पवित्र रमजान महिना दिनांक १९ फेब्रुवारी पासून होत असून या पार्श्वभूमीवर उर्दू माध्यम शाळा (जि.प./ खाजगी) सकाळ सत्रात भरविण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद बीड यांच्याकडून सर्व गटशिक्षणाधिकारी यांना आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.सदर निर्णयाचे महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी स्वागत केले असले,तरी माध्यमापुरती मर्यादा घालण्यात आल्याबाबत महासंघाने चिंता व्यक्त केली आहे.

महासंघाच्या वतीने, शिक्षणाधिकारी(प्रा)जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,पवित्र सण रमजान हा सर्व मुस्लिम बांधवांकडून श्रद्धेने पाळला जाणारा धार्मिक आचार असून मराठी व इतर माध्यम शाळांमध्ये कार्यरत असलेले मुस्लिम शिक्षक देखील रोजा पाळत अध्यापन कार्य करीत असतात.अशा परिस्थितीत माध्यमाच्या आधारे सवलत मर्यादित ठेवणे ही बाब घटनात्मक समतेच्या तत्त्वाशी विसंगत ठरू शकते. महासंघाने भारतीय राज्यघटनेतील कलम १४ (कायद्यापुढे समानता),कलम १५ (धर्माच्या आधारावर भेदभावास मनाई)व कलम २५ (धर्मस्वातंत्र्याचा हक्क) यांचा उल्लेख करत प्रशासनाने भेदभावरहित व समताधिष्ठित भूमिका घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.तसेच ,२००९ अंतर्गत शालेय व्यवस्थापन करताना शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा व कल्याणाचा विचार करणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.याबाबत संघटनेने शिक्षणाधिकारी (प्रा) यांना निवेदन सादर करून,पवित्र सन रमजान कालावधीत मराठी व इतर माध्यम शाळांतील मुस्लिम शिक्षकांना सकाळ सत्राची सुविधा किंवा वेळ सवलत देण्याबाबत तात्काळ पूरक आदेश निर्गमित करण्याची मागणी केली आहे.ही मागणी कोणत्याही विशेष लाभासाठी नसून समानतेच्या घटनात्मक तत्त्वाच्या रक्षणासाठी आहे.माध्यमाच्या आधारावर शिक्षकांमध्ये भिन्नता निर्माण होणे योग्य नाही.प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा असेही यात नमूद केले आहे.रमजान महिना तातडीने सुरू होत असल्यामुळे निर्णयात विलंब झाल्यास शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होऊ शकतो,असेही महासंघाने नमूद केले आहे. प्रशासनाने समताधिष्ठित व न्याय्य निर्णय घेतल्यास त्याचे स्वागत करण्यात येईल.असे महासंघाच्या वतीने तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार जिल्हा संघटन प्रमुख भारत टाकणखार जिल्हा उपाध्यक्ष वसंत टाकणखार तसेच तालुका कार्यकारणी पदाधिकारी अभिमन्यू इबीते,आजीमुद्दीन खतीब,शेख मतीन,सय्यद आयुब,निलेश गावडे,हनुमंत पांढरपोटे,रवी आदमाने,शिवाजी भाळशंकर,प्रतिक स्वामी,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,रमेश लव्हाळे,किरण शिंदे,नारायण भाळशंकर,किरण माने,राजकुमार सोनवणे,कृष्णा हौसरमल, ना.मा.पडलवाड, अविनाश येळबकर,सुमेध घाडगे, धोंडीराम रामूळे,जीवन डोंगरे,शंकर पवार, गोविंद पवार,अमोल राऊत,राहुल खुणे, नितीन पुटवाड, गणेश भदर्गे, विजय वैराग्य,आदीनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.



## शालेय साहित्य वाटप करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे यांनी अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माळेगाव हायस्कुल मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

गेल्या काही वर्षापासुन सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे हे महापुरुषांच्या विचारांना अनुसरून अशी प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करतात यावेळी सुद्धा त्यांनी तीच सामाजिक बांधिलकी जोपासत अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांनी सुकळी येथील शिवारात असणाऱ्या माळेगाव हायस्कुल माळेगाव मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत महापुरूषांच्या विचारांना अभिप्रेत अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करत त्यांना अभिवादन केले.यावेळी मुख्यध्यापक एस.एम लोकरे,शिक्षक कर्मचारी ए.एस जाधव,एस.आर सारूक,एस.बी गुजर,एम.एम लामतुरे,एम.एस फुंदे,जी.जे कदम,डि.वाय नागरगोजे,बी.बी भोसले,ए.डी इतापे व विद्यार्थी उपस्थित होते.

# उच्च शिक्षणातून नेतृत्व घडते; गुणवत्तावृद्धीसाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे

### सातत्य, नियोजन आणि आत्मविश्वास हेच यशाचे मंत्र – सीनियर मॅनेजर श्याम पवार

बीड । प्रतिनिधी

आदित्य कृषी महाविद्यालय येथे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी व कृषी क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाविद्यालय हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून नेतृत्व व गुणवत्तावृद्धी घडविण्याचे केंद्र आहे, असे प्रतिपादन प्राचार्य श्याम भुतडा यांनी केले, तर नियमित अभ्यास, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या बळावर बँकिंग क्षेत्रात नक्कीच यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश सीनियर मॅनेजर श्याम पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

आदित्य शिक्षण संस्था अंतर्गत आयोजित या उपक्रमात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. प्राचार्य श्याम भुतडा यांनी महाविद्यालयाची स्थापना, शैक्षणिक प्रगती आणि संशोधनात्मक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कृषी प्रात्यक्षिके, शेतकरी मार्गदर्शन शिबिरे, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संशोधन प्रकल्प व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांचा विशेष उल्लेख करत त्यांनी गुणवत्ता वृद्धीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत एम.एस्सी. (कृषी), एम.टेक (कृषी अभियांत्रिकी), एमबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट) आदी अभ्यासक्रमांविषयी मार्गदर्शन केले. आधुनिक शेती,




हवामान बदल, मृदा व्यवस्थापन व तंत्रज्ञानाधारित शेतीसाठी तज्ञाची गरज वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

सीनियर मॅनेजर श्याम पवार यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध संधींचा आढावा घेत सरकारी, खासगी व सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा आणि आवश्यक कौशल्ये याविषयी माहिती दिली. संवाद कौशल्य, संगणक ज्ञान, गणितीय व तर्कशक्ती, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व या गुणांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. सुरुवातीपासूनच आकर्षक वेतन व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर यश संपादन करता येते, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. धनंजय सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी संग्राम तनपुरे यांनी तर आभार डॉ. निर्मला ठोके यांनी मानले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व दिले पटवून

**आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत एम.एस्सी. (कृषी), एम.टेक (कृषी अभियांत्रिकी) व एमबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट) आदी अभ्यासक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक शेतीत संशोधनाधारित तंत्रज्ञान, हवामान बदल, मृदा व्यवस्थापन व कीड-रोग नियंत्रणासाठी तज्ज्ञांची गरज वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच स्पर्धा परीक्षांचे योग्य नियोजन करून वेळेत अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.**

### जिद्द व चिकाटीने यश संपादन शक्य

**आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. अमोल सानप यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक जीवनात मेहनत, जिद्द आणि चिकाटीचे महत्त्व पटवून दिले. योग्य दिशादर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षणकाळातच स्पष्ट उद्दिष्ट ठरवून त्यासाठी नियोजनबद्ध तयारी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.**

## पान ६ वरुन...

### दर्याभवानी नाटकास

जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर, तहसीलदार विनोद ननवरे सहाय्यक महसूल अधिकारी सविता दातार, साहित्यप्रेमी, लेखक, कलाकार, अधिकारी, कर्मचारी,नागरिक विद्यार्थी विशिष्ट मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवजयंती निमित्ताने आयोजित केलेल्या नाटक दर्याभवानी, या नाटकास रसिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. शासकीय कार्यक्रम व विनामुल्य होते याला रसिक श्रोत्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला, बीडकरांनी या पर्वणीचा हर्षभराने आनंद लुटला. रसिकांनी या कार्यक्रमास दाद दिल्याने दर्याभवानी नाटकांच्या संयोजक व कलाकारांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रथम दिप प्रज्वलनाने झाली आणि शिक्षक सुंदरराव कोटुळे यांनी आभार मानले.

### ज्ञानसागर गुरुकुलमध्ये

जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराज विषयी आपापले मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानसागर गुरुकुल चे संचालक गणेश सानप सूत्रसंचालन आदर्श बांगर व आभार स्वाती सानप यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन रवी सानप, मामा,यांनी केले. कार्यक्रमास पालकासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### आष्टी तालुक्यात शिवजयंतीचा

शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शिवरायांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या आदर्शांचे स्मरण करण्यात आले.

**शिवतीर्थावर मानाचा मुजरा**

आष्टी येथील शिवतीर्थावर सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांच्या पुढाकाराने छत्रपतींना मानाचा मुजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस, आष्टी तालुका पत्रकार संघ, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

**१०१ फूट भगव्या शिवध्वजाचे ध्वजारोहण**

आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे १०१ फूट उंच भगव्या शिवध्वजाचे ध्वजारोहण मोठ्या दिमाखात करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस, शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, जि.प. सदस्य बद्रीनाथ जगताप, सभापती किशोर हंबर्डे, अजिनाथ सानप, नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे तसेच व्यापारी, युवक आणि शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते. भगव्या ध्वजाच्या फडकण्याने परिसरात उत्साहाची लाट उसळली.

**मिरवणुकीऐवजी सामाजिक उपक्रम**

यंदा छत्रपती शिवाजी महाराज चौकात मिरवणुकीवरील खर्चाला फाटा देत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा, शिवचरित्र वाचन उपक्रम या उपक्रमांमुळे शिवजयंती उत्सवाला सामाजिक बांधिलकीची दिशा मिळाली. गरजू विद्यार्थ्यांना सायकली मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला मोठा हातभार लागणार आहे.

**खेडोपाडी व्याख्यानमाला व महाप्रसाद**

तालुक्यातील विविध गावांमध्ये शिवचरित्रावर आधारित व्याख्यानमाला, कीर्तन, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. शिवरायांच्या शौर्यगाथा आणि प्रशासन कौशल्याची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिवजयंती उत्सवातून समाजात एकता, पराक्रम, स्वाभिमान आणि लोककल्याणाची प्रेरणा देण्याचा संदेश देण्यात आला. शिवरायांच्या विचारांवर चालत समाजातील दुर्बल घटकांना बळ देण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला. अशा विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आष्टी तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या हर्षोल्हासात आणि अभिमानाने साजरी करण्यात आली.

### शिवजन्मोत्सव रक्तदान

संकल्पनेतून गेल्या सहा वर्षांपासून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन १९ फेब्रुवारीला करण्यात येते. परळी येथील वैद्यनाथ रक्त पेडी चे तंत्रज्ञ बिबीशन सांगळे,भाविका गाथे यांनी २४५ तरुण-तरुणींचे रक्तदान करवून घेतले. दिंद्रुड व पंचक्रोशीतील शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मुर्ती व सहभाग प्रमाणपत्र याप्रसंगी देण्यात आले. खोलेश्वर परिवारातर्फे रक्तदात्यांना चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली होती. खोलेश्वर मल्टीस्टेट मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर, खोलेश्वर मल्टीस्टेट मधील सर्व कर्मचारी आदी शिवभक्तांनी या रक्तदान शिबीरात अथक परिश्रम घेतले. शाळेच्या परिसरात केलेल्या गडकिल्ल्यांच्या देखाव्यामुळे परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. दिंद्रुड येथील अशोक फरताडे यांनी हि माझी ६५ वी रक्तदान करण्याची वेळ असल्याचे सांगितले. खोलेश्वर परिवाराच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला १५ महिलांनी रक्तदान केले .

### शिवसेनेच्या वतीने रविवारी

बीड या ठिकाणी रविवार दि २२ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होणार होणार आहे. सदरील मेळाव्या नामांकित कंपनी चे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असुन, अनुभव असणाऱ्यांना स्पॉट वर नियुक्ती, तर फ्रेशर तरुणांना प्रशिक्षण देऊन नोकरीं ची संधी मिळणार आहे. सोबत शैक्षणिक कागदपत्रे ठेवावीत. बीड जिल्हातील १० वी पास व त्यावरील शिक्षण असणाऱ्या तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हापमुख सुशील पिंगळे यांनी केले आहे.

----------------

cmyk

# वैशिष्ट्यपूर्ण गहू वाणांच्या व्यावसायिकी करणासाठी प्रयत्न व्हावेत -कृषी आयुक्त

नाशिक / प्रतिनिधी

'महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कुंदेवाडी (ता. निफाड) येथील गहू संशोधन केंद्र येथील संशोधन शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, केंद्राने विकसित केलेले 'फुले समाधान' आणि 'फुले सात्विक' यांसारखे वैशिष्ट्यपूर्ण वाण आता मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक करण्यासाठी प्रयत्न व्हावेत,'' असे प्रतिपादन कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी केले.



कृषी आयुक्त मांढरे यांनी निफाड येथील कृषी संशोधन केंद्राला भेट दिली. या वेळी त्यांनी विविध प्रयोगांची पाहणी केली. भेटीदरम्यान संशोधन केंद्राने विकसित केलेल्या विविध गव्हाच्या वाणांची माहिती घेतली. अधिक उत्पन्न देणाऱ्या, कमी कालावधीमध्ये येणाऱ्या, तांबेरा रोगास प्रतिकारक, बुटकी न लोळणारी अशा 'फुले समाधान' हे वाण पाहिले. त्याचप्रमाणे संशोधन केंद्राने विकसित केलेले कमी पाण्यात येणारे विविध वाण तसेच उशिरा पेरणीसाठी उपयुक्त वाण, उच्च पोषण युक्त (बायो फोर्टिफाइड) या गटातील वाण त्याचप्रमाणे संशोधन केंद्राने विकसित केलेला 'फुले सात्त्विक या वाणाची माहिती घेतली. हा वाण बिस्कीट उद्योगासाठी उपयुक्त आहे. असे विविध वैशिष्ट्यपूर्ण वाण करण्यासाठी प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. संशोधन केंद्रावरील संशोधन, व्यवस्थापन आणि परिसर बघून कृषी आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. या वेळी त्यांच्यासोबत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी शिक्षण संचालक डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.भालचंद्र म्हस्के, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद, उपविभागीय कृषी अधिकारी भटू पाटील, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार, मंडळ कृषी अधिकारी मनोज रोंगटे, सुभाष वाकचौरे, जनार्दन क्षीरसागर, राहुल धनगर, संशोधन केंद्राच्या वतीने गहू पैदासकार डॉ. नीलेश मगर, कृषी विद्यावेत्ता प्रा. संजय चितोडकर, प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. भरत मालुंजकर, राजेश लोखंडे, बाळू झडे यांच्यासह केंद्रावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निफाड येथील काम राष्ट्रीय स्तरावर नेणार

कमी पाण्यात येणारे आणि उशिरा पेरणीसाठी उपयुक्त वाणांची त्यांनी पाहणी केली. 'बायो-फोर्टिफाइड' (उच्च पोषणयुक्त) वाणांच्या संशोधनावर भर, गहू पिकावरील तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरू असलेल्या संशोधनाची दिशा, केंद्रावर सुरू असलेला बीज उत्पादन कार्यक्रम याची माहिती घेत चर्चा केली. निफाड केंद्रावरील संशोधन आणि बीजोत्पादनाची पाहणी करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील 'मॉनिटरिंग टीम' देखील उपस्थित होती. आयुक्तांनी या राष्ट्रीय शास्त्रज्ञांशी चर्चा करून निफाड येथील कार्याची राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाशी सांगड घालण्याबाबत विचारविनिमय केला.




### जागतिक दिवस
### सामाजिक न्याय दिवस

#### महत्वाच्या घटना

१७९२ : जॉर्ज वॉशिंग्टनने टपाल सेवा कायद्यावर सही केल्यामुळे अमेरिकेत टपाल खात्याची सुरूवात झाली.
१८३५ : आजच्या दिवशी कोलकत्ता मेडिकल कॉलेज मध्ये अधिकारारिक रित्या विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु केले.
१८४६ : इंग्रजांनी आजच्या दिवशी लाहोर वर ताबा मिळवला.
१८४७ : घोड्यांच्या शर्यतीची संस्था रॉयल कलकत्ता टर्फ क्लब ची स्थापना करण्यात आली.
१८६८ : बंगाल चे प्रसिद्ध वृतपत्र 'अमृत बाजार पत्रिका' आजच्या दिवशी सुरुवात झाली.
१९३५ : कॅरोलीन मिकल्सेन हि पहिल्यांदा अंटार्क्टिका येथे हि पाउल ठेवणारी पहिली महिला ठरली.
१९४७ : तत्कालीन ब्रिटीश प्रधानमंत्री क्लीमेंट एटली यांनी भारताचे स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली.
१९७८ : शेवटचा 'ऑर्डर ऑफ व्हिक्टरी' सन्मान लिओनिद ब्रेझनेव्ह यांना देण्यात आला.
१९८७ : मिझोराम भारताचे २३ वे राज्य बनले.
२००९ : संयुक्त राष्ट्र संघाने २० फेब्रुवारी ला सामजिक न्याय दिवस म्हणून साजरे करण्यास सुरुवात केली.
२०१४ : बऱ्याच गदारोळानंतर राज्यसभेतही आंध्र प्रदेशच्या विभाजनाचे विधेयक संमत झाल्याने 'तेलंगण' हे भारताचे २९ वे राज्य बनले.


#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : लुडविग बोल्टझमन – ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ५ सप्टेंबर १९०६)
१९०१ : इजिप्त चे पहिले अध्यक्ष मिसर मुहम्मद नागुईब यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑगस्ट १९८४)
१९०४ : अलेक्सी कोसिजीन – रशियाचे पंतप्रधान (मृत्यू: १८ डिसेंबर १९८०)
१९२१ : हरियाणा चे माजी मुख्यमंत्री राव वीरेंद्र सिंह यांचा जन्म.
१९२५ : जपानी सुमो ४४ वे योकोझुना तोचीनिशिकी कियोटाका यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९९०)
१९३२ : प्रसिद्ध नाटककार के.वी.सुबन्ना यांचा जन्म.
१९३६ : माजी भारतीय फुटबॉल खेळाडू जर्नल सिंह यांचा जन्म.
१९५१ : गॉर्डन ब्राऊन – इंग्लंडचे पंतप्रधान
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेता अन्नू कपूर यांचा जन्म.
१९७३ : भारतीय चित्रपट अभिनेते प्रियांशु चटर्जी यांचा जन्म.
१९८८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री जिया खान यांचा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०५ : विष्णुपंत छत्रे – भारतातील सर्कस उद्योगाचे जनक (जन्म:१८४६)
१९१० : ब्युट्रोस घाली – इजिप्तचे पंतप्रधान (जन्म: १८४६)
१९५० : बॅ. शरदचंद्र बोस – स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (जन्म: ६ सप्टेंबर १८८९)
१९७४ : के. नारायण काळे – नाट्यसमीक्षक (जन्म: )
१९९३ : प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स लॅम्बोर्गिनी कारचे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचे निधन.
१९९४ : त्र्यं. कृ. टोपे – घटनातज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू.
१९९७ : श्री. ग. माजगावकर – पत्रकार, 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक इंद्रजित गुप्ता – केन्द्रीय गृहमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: १८ मार्च १९१९)
२०१२ : डॉ. रत्नाकर मंचरकर – संत साहित्याचे गाढे अभ्यासक, साक्षेपी समीक्षक व संशोधक (जन्म: ६ आक्टोबर १९४३).

# तापट स्वभावाची, 'तोडा म्हैस', जाणून घ्या विशेषता!



तामिळनाडू राज्यात आढळणारी 'तोडा म्हैस' तेथील आदिवासी समाजासाठी महत्त्वाची आहे. तोडा या आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक जीवनामध्ये विशेषतः जन्म, मृत्यू, लग्नकार्य इ. प्रसंगांच्या वेळी या जातीच्या म्हशींना विशेष स्थान आहे.

उगम स्थान : तोडा म्हैस ही तामिळनाडू राज्यातील नीलगिरी टेकड्यांच्या टापूमध्ये आढळते. तोडा या आदिवासी जमातीकडून दूध उत्पादनांसाठी ही गाय पाळली जाते. या आदिवासी जमातीच्या नावावरून या म्हशीला तोडा हे नाव पडले असावे.

शरीर रचना : इतर म्हशींपेक्षा दिसायला ह्या अगदी वेगळ्या आहेत. शरीर (धड) लांब असून त्यांची छाती विस्तृत व भरदार असते. पाय आखूड पण मजबूत असतात व त्या चांगल्याच ताकदवान असतात. शिंगे लांब आणि अर्धगोलाकार आकारात बदलणारी असतात. शिंगे पायथ्याशी जाड असून प्रथम बाहेरच्या दिशेने वळून, थोडेसे खालच्या दिशेने जातात आणि वरच्या दिशेने बाहेर पडतात. शेवटी शिंगाचे टोक आतील बाजूस वळलेले असतात ज्यामुळे शिंगांचा वैशिष्ट्य पूर्णपणे चंद्रकोर आकार किंवा अर्धवर्तुळ बनतो. प्रौढ म्हशींमध्ये, कातडीचा मुख्य रंग भुरकट आणि राखाडी असतो. म्हशीचे वजन सुमारे ३८० किलोपर्यंत असते. प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : जवळपास ४७ महिन्यात ही म्हैस प्रथम माजावर येते. सरासरी दूध देण्याचा कालावधी हा २०० ते २५० दिवसांचा असून एका वेतात ५०० लिटर पर्यंत दूध देतात. दिवसाला ४.५ ते ७ लिटर दूध देतात. विशेष माहिती : म्हशीची ही जात जास्त पाऊस आणि जास्त आर्द्रता असलेल्या भागात चांगली वाढते. या म्हशीचा स्वभाव तापट व खुनशी असतो. वन्य म्हशीप्रमाणे या माणसावर चाल करून जातात. त्यामुळे सावध राहावे लागते. सध्या या म्हशींची लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. आदिवासी भागात ही म्हैस संख्येने १५०० पेक्षा कमी आहे.

# पीक उगवण्यापूर्वीच करा तणनियंत्रण

अनेकदा पेरणीपूर्वी मेहनत घेऊन मशागत केली असली तरी देखील तण हे उगवून येतातच. त्यामुळे पिकांची वाढ नीट होत नाही. त्यामुळे ताणांचा योग्य वेळी बंदोबस्त करणे महत्वाचे असते. त्याकरिता योग्य पद्धतीने तणनाशकांचा वापर करावा लागणार आहे.



तणनाशकाची निवड : तणाचे व्यवस्थापन हा एक उत्पादनवाढीच्या अनुशंगाने महत्वाचा घटक आहे. आतापर्यंत पीक उगवून आल्यावर तणाच्या नियंत्रणाबाबत उपाययोजना केली जात होती. पण आता पीक उगवण्यापूर्वीच तणाचे नियंत्रण केले जात आहे. पेरणीनंतर पीक उगवणी पुर्वी एकदल पिकांमध्ये अ‍ॅट्राझीन, द्विदल पिकासाठी पेंडीमेथिलिन ही तणनाशके वापरावीत. उभ्या पिकातील तणनियंत्रणासाठी सुद्धा तणनाशकांचा वापर करता येतो. मात्र त्यासाठी पिकांचा वर्ग माहीत असणे आवश्यक आहे. उभ्या पिकांमध्ये तणनाशकांचा चांगला परिणाम दिसण्यासाठी तने दोन ते चार पानावर असतांना फवारणी करावी.


फवारणी करताना काळजी : तणनाशकाची फवारणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा असावा. तर फवारणीसाठी पाठीवरील साधा फवारणी पंप वापरावा. फवारणीचा अंश पिकावर जाऊ नये यासाठी वाऱ्याचा वेग कमी असताना फवारणी करावी. हरभरा हे पीक उगवण्यापूर्वी पेंडीमेथिलिन २.५ लिटर हे तणनाशक प्रति हेक्टरी ३०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे लागणार आहे. फवारणी केल्यानंतरही सहा आठवड्याने खुरपणी ही शेतकऱ्यांना करावीच लागणार आहे.मका : पिक उगवणीपुर्व अ‍ॅट्राझीन (५० डब्ल्यू पी ) १००० ग्रॅम हे ३०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर क्षेत्रावरील पिकावर फवारणी करता येणार आहे. रब्बी हंगामाती कांद्याही उगवण्यापूर्वी ऑक्सीफ्लोरफेन एक लिटर किंवा पेंडीमेथिलिन २.५ लिटर हे ३०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टरावरील क्षेत्रावर फवारणी करावी लागते. मात्र, फवारणी करुनही सहा आठवड्यांनी पुन्हा कांद्याची खुरपणी ही करावीच लागणार आहे.

करडई : यंदा करडईच्या क्षेत्रामध्ये वाढ होताना पाहवयास मिळत आहे. करडई उगवण्यापूर्वी ऑक्सिफ्लोरफेन एक लिटर हे तणनाशक ३०० लिटर पाण्यात मिसळून एक हेक्टरवरील पिकावर फवारणी करता येणार आहे. यामुळे पिक उगवून येईपर्यंत तण नियंत्रणात येईल पण पुन्हा पेरणीनंतर सहा आठवड्यांनी एक खुरपणी ही करावीच लागणार आहे.

असा होईल फायदा : पेरणीपूर्व फवारणीचे प्रमाण आता वाढत आहे. कारण पूर्वी पिकांची उगवण होण्यापूर्वीच तण वाफत होते. त्यामुळे खुरपणीवर अधिकचा खर्च करुनही पिक जोमात येत नव्हते. पण आता पेरणीपुर्वच तणनाशकाची फवारणी केली जात आहे. यामुळे अधिकचा खर्च होत असला तरी पिकांची वाढ जोमाने होते. शिवाय पेरणीनंतर काही काळ खुरपणी करण्याची आवश्यकता भासत नाही. हे तणनाशकाचे फायदे आहेत.

# पौष्टिक तृणधान्य राळा पिकाचे लागवड तंत्रज्ञान

**राळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवते. अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर केला जातो. राळ्याचा अँटिऑक्सिडण्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारशक्ती वाढवतो. लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूला ऑक्सिजन पुरवठा सुरळीत ठेवून मेंदूची कार्यक्षमता वाढवते. मोड आलेले राळा खाल्ल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. मधुमेह आणि पोटाच्या आजारांवर 'राळा' हे पौष्टिक अन्न म्हणून उपयुक्त आहे.**



पिकाची ओळख, महत्त्व व सुधारित लागवड तंत्रज्ञान : राळा हे गवतवर्गीय कुळातील पीक असून या पिकाची धान्य व तसेच चारा म्हणून आशिया, आफ्रिका व अमेरिका खंडात लागवड केली जाते. या पिकाचे स्वपरागीभवन, कमी पक्वता कालावधी व ४ वर्गीय तृणधान्य हे प्रमुख गुणधर्म आहेत. भारतात या पिकाची आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यात लागवड केली जाते.

लागवडीच्या दृष्टीने महत्त्व : कमी पक्वता कालावधी असणारी पिके, हलक्या व जमिनीत उत्तम वाढ होते. वाढीच्या काळात कमीत कमी निविष्ठा वापरून वाढ पूर्ण करतात,सुधारित तंत्रज्ञानानुसार लागवड केल्यास उत्तम प्रतिसाद देणारी व अधिक उत्पादन देणारी पिक आहेत. बदलत्या हवामानात तग धरणारी पिक व तसेच आकस्मिक शेतीकरिता नियोजन केले जाऊ शकते. उत्तम प्रकारचे पौष्टिक गुणधर्म असल्याने आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर. भविष्यात मागणी वाढणारी पीक आहे.

जमीन व हवामान : या पिकाच्या लागवडीसाठी हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन उत्तम आहे. महाराष्ट्रात या पिकाची लागवड अत्यल्प क्षेत्रावर केली जाते. दक्षिणेकडील आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यात लागवड क्षेत्र अधिक आहे. तसेच या पिकाची लागवड ५०० ते ७०० मि.मी. वार्षिक पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी करता येऊ शकते.

पूर्वमशागत : जमिनीची खोल नांगरट करुन उभ्या आडव्या कुळवाच्या दोन पाळ्या देऊन ४ ते ५ टन शेणखत/कंपोस्ट खत याचवेळी शेतात मिसळून जमीन भुसभुशीत करावी. पूर्वी घेतलेल्या पिकाचे धसकटे, काडीकचरा व बहुवार्षिक गवताचे अवशेष वेचून शेत स्वच्छ करावे.

सुधारीत वाण : राज्यात लागवड केले जाणारे सुधारित वाण महाराष्ट्रात राळा या पिकाचा 'पी.डी.के.व्ही. यशश्री' वाण लागवडीसाठी सन २०२३ मध्ये शिफारसित करण्यात आलेला आहे. हा वाण डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा येथून विकसित करण्यात आलेला आहे. धान्य उत्पादन क्षमता (२३२४ कि./हे.), कडबा उत्पादन क्षमता (४४८९ कि./हे.), या वाणाचे दाणे मध्यम टपोरे असून रंग आकर्षक फिक्कट पिवळसर आहे. हा वाण ८१-८५ दिवसात पक्व होतो. या वाणाचे कणीस घट्ट असतात. हा वाण करपा आणि तांबेरा रोगास सहनशील आहे.

पेरणीची पध्दत व लावणीची वेळ : या पिकाचा खरीप हा प्रमुख हंगाम आहे. बियाणे पेरणी पावसाचे आगमन होताच अथवा पाण्याची सुविधा असल्यास जूनच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. रोपांची लागण रोपे २० ते २५ दिवसांची झाल्यावर जुलैच्या पहिल्या पंधरवाड्यात मुख्य शेतात ओळीमध्ये करावी.

बियाणे प्रमाण : पेरणीद्वारे पिक लागवड करायची असल्यास ओळीमध्ये पेरणी करावी. त्यासाठी ८ ते १० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे. धान्याचा आकार लहान असल्याने त्यामध्ये २ ते ४ पट माती एकत्र करून पेरणी करावी म्हणजे पेरणी दाट होणार नाही. बियाणे १ ते १.५ से. मी. पेक्षा जास्त खोल जाणार नाहीत याची काळजी घ्यावी म्हणजे उगवण चांगली होते.

पेरणी अंतर : पेरणी करताना दोन ओळीमधील अंतर ३० से.मी. (एक फुट) व दोन रोपामंधील अंतर १० से.मी. ठेवावे.

खत व्यवस्थापन : पेरणीपूर्वी एक महिना अगोदर शेणखत अथवा कंपोष्ट खत ५ ते १० टन प्रतिहेक्टर या प्रमाणे जमिनीत मिसळून द्यावे. राळा पिकासाठी रासायनिक खताची मात्रा ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश प्रति हेक्टर याप्रमाणे द्यावे. अर्धे नत्र व संपूर्ण पालाश व संपूर्ण स्फुरद मात्रा पेरणी करताना द्यावी व उरलेले अर्धे नत्र पेरणी नंतर एक महिन्याने द्यावे.

पाणी व्यवस्थापन : या पिकाची लागवड कमी पावसाच्या भागात परंतु पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी करता येते. पावसाळी हंगामात पावसाचा जास्त दिवस खंड पडल्यास पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. पहिले पाणी फुटवे अवस्थेत, दुसरे फुलोरा येताना व तिसरे पाणी दाणे भरण्याच्या अवस्थेत देणे आवश्यक आहे. त्यामुळे दाणे चांगले भरून उत्पादनात वाढ होते.

पीक संरक्षण (किड व रोग व्यवस्थापन) : करपा () रोग: 'राळा' या पिकामध्ये कणसातील करपा रोगाचा प्रादुर्भाव होतो. यामध्ये पानांवर दंडगोलाकार पांढरे ठिपके येतात व नंतर त्याचा आकार वाढून संपूर्ण पानावर, खोडावर पसरतात. त्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळत नाही.

या रोगाच्या नियंत्रणासाठी थायरम किंवा कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाची २ ग्रॅम/किलो बियाणे याप्रमाणे पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी अथवा ०.१ % प्रमाणे फवारणी करावी. पेरणीनंतर पिक ६ आठवड्याचे असताना खोडकिडीचा प्रादुर्भाव सुरु होतो. या किडीच्या अळीद्वारे मुख्य खोडाचे नुकसान होऊन मर होते. त्यामुळे फुटव्यावर परिणाम होतो. सर्वाधिक नुकसान जुलै महिन्याच्या शेवटी व ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला जाणवते. खोडकिड नियंत्रणासाठी प्रचलित किडनाशकाचा किंवा पद्धतीचा वापर करावा. पावसाळा सुरु होताच ७ ते १० दिवसाच्या आत पेरणी करावी तसेच पेरणीकरीता जास्त बियाणे वापरावे.

आंतरमशागत : आंतरमशागत करताना रोपांची प्रति एकरी योग्य संख्या ठेवण्यासाठी पेरणीनंतर २० दिवसांच्या आत विरळणी करावी. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात पिकाची वाढ संथ गतीने होत असल्याने तणे पिकाशी स्पर्धा करतात. त्यामुळे तणनियंत्रणासाठी एक कोळपणी करुन गरजेनुसार एक महिन्याच्या आत एक खुरपणी करावी.

काढणी व मळणी : राळा पिकाच्या विविध वाणानुसार पक्वता कालावधी वेगळा असू शकतो. साधारणपणे ८० ते १०० दिवसात पीक काढणीस सुरुवात करावी. काढणीस उशीर झाल्यास कणसातील/बोंडातील दाणे झडण्याची शक्यता असते. पिकाची काढणी करताना कणसे/बोंडे विळ्याने कापून करावी. दोन-तीन दिवस उन्हात चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करुन ठेवावे.

उत्पादन : हे पीक लागवड करताना वापरण्यात येणाऱ्या निविष्ठा व सुधारित तंत्रज्ञानास उत्तम प्रतिसाद देणारे पिक आहे. या पिकापासून सरासरी हेक्टरी २० ते २५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन घेता येते.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# रायगड किल्ला,महाराष्ट्राची शान

## मराठा क्रांती मोर्चा शिवजन्मोत्सव : शिवगितांवर आमदारांसह थिरकली तरुणाई

जालना । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त मराठा क्रांती मोर्चा प्रणित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा झाला. नाशिक येथील बँजो पथकाने गाऊन सादर केलेल्या आज उगवला सूर्य नभी ,,,नव्या नवलाईचा,,,! एकच राजा इथे जन्मला शिवनेरी किल्ल्यावर...,! रायगड किल्ला,, महाराष्ट्राची शान आहे..., अशा शिव गीतांवर आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे, उपमहापौर राजेश राऊत , यांच्यासह तरुणाईने तुफान जल्लोष करत ठेका धरला. गांधी चमन येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय ...,राष्ट्रमाता, राजमाता , माँ जिजाऊ साहेबांचा विजय असो,जय भवानी,जय शिवाजी,अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला.



मिरवणुकीत नाशिक येथील पन्नास जणांच्या पथकाने छत्रपती शिवरायांवर आधारित गीतांचे सादरीकरण केले. सजवलेल्या रथात राष्ट्रमाता ,राजमाता, माँ जिजाऊ, अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज, घोड्यावर मावळे, असा सजीव देखावा सादर करण्यात आला. आ. अर्जुनराव खोतकर, आ. नारायण कुचे, महापौर वंदना मगरे,जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल,माजी आ.अरविंदराव चव्हाण, भास्करराव पाटील दानवे, दीपक बोऱ्हाडे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समितीचे संस्थापक तथा स्वागताध्यक्ष यांनी शिव महोत्सव होण्यासाठी खासदार, आमदारांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी समितीचे विश्वंभर तिरुखे , परिविक्षाधीन पोलीस अधीक्षक जानवी शेखर ,उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी , संजय लाखे , पंडितराव भुतेकर ,भाऊसाहेब घुगे,मनपाचे गटनेते महेश निक्कम, , प्रशांत म्हस्के, शिवाजी मस्के,सिद्धिविनायक मुळे,डॉ. बळीराम बागल, डॉक्टर आशिष राठोड, यांच्यासह शिवप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .पोलीस प्रशासनातर्फे मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता .अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड सह साडेचारशे पोलीस कर्मचारी मिरवणुकीवर लक्ष ठेवून होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



परतूर । प्रतिनिधी

वरफळ येथील ग्रामपंचायत आणि समस्त ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती म्हणजेच शिवजयंती अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे गावातील सर्वधर्मीय बांधवांचा असलेला उत्स्फूर्त सहभाग,जो शिवरायांच्या सर्वसमावेशक स्वराज्याची आठवण करून देत होता. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन कार्यक्रमाची सुरुवात गावचे सरपंच जुबेद राजा शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी सरपंच महोदयांनी आपल्या भाषणात शिवरायांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि न्यायाचे दाखले दिले.

त्यांच्यासोबत ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल भी.खंडागळे, तुकाराम राठोड आणि विठ्ठल खंडागळे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षिका यांनीही महाराजांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.ग्रामस्थांचा मोठा सहभाग यावेळी गावातील प्रमुख नागरिक संतोष खंडागळे, राजु भदर्गे, उत्तम भदर्गे, गजानन गौरे, सरोवर शेख, अनिल मगर ,गोरख धापसे, यांसह अनेक शिवप्रेमी तरुण आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा शिवमय; मिरवणुका, ढोलताशांचा गजर, लेझीम, भगवे फेटे, भगव्या पताका अन् अभिवान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

'निश्चयाचा महामेरू बहुतजनांसी आधारू, अखंड स्थितीचा निर्धारू श्रीमंत योगी' असे ज्यांचे वर्णन केले गेले, ते महाराष्ट्राचे आराध्य दैवत व 'रयतेचा राजा' असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती अहिल्यानगर शहरात गुरुवारी अत्यंत उत्साहात आणि धूमधडाक्यात साजरी करण्यात आली. ढोलताशांचा निनाद, लेझीम पथक, भगवे फेटे, भगव्या पताका अन् सर्व काही भगवे या वातावरणात निघालेल्या मिरवणुका हे या शिवजयंतीचे वैशिष्ट्य ठरले.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा प्रशासन आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपरिक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस बँड पथकाचे महाराष्ट्र गीत, जिजाऊ वंदना आणि शिवआरतीने गगन दुमदुमून गेले.

संपूर्ण शहरात जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी दुमदुमून गेलेले वातावरण भक्ती, देशभक्ती आणि अभिमानाने भारावून गेले होते. शिवजयंतीच्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सकाळी झाली. या वेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतिताई गाडे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, ॲड. विश्वासराव आठरे, प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते शिवआरती करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर पोलीस बँड पथकाने महाराष्ट्र गीताने मानवंदना दिली. 'जिजाऊ वंदना' आणि पाळणा उत्सव' यामुळे वातावरण अत्यंत मंगलमय झाले. हभप सिद्धनाथ मेटे महाराज यांच्या मंत्रोच्चाराने महापूजा झाली आणि नंतर पारंपरिक मिरवणुकीचा शुभारंभ झाला. मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित देखावे, विद्यार्थ्यांची ऐतिहासिक वेशभूषा, गुरुजनांचा सहभाग, तसेच मराठा साम्राज्याच्या पराक्रमाचे दर्शन घडविणारे रथ हे नागरिकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उभे असलेल्या नागरिकांनी जय शिवरायच्या घोषणा देत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. या प्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास म्हणजे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांच्या कार्यातून आपण ऊर्जा आणि धैर्य मिळवतो. युवकांनी शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्या जीवनात उतरवावा. शौर्य, संघटन आणि स्वाभिमान या तत्त्वांवर उभे राहून देश आणि समाजाची सेवा करावी. ते पुढे म्हणाले, जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने शिवजयंती साजरी करून इतिहास जिवंत ठेवला आहे. अशा देखाव्यांच्या माध्यमातून आपण आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवतो. महापौर ज्योतिताई गाडे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राजा नव्हते, ते राष्ट्रपुरुष होते. त्यांचा प्रत्येक निर्णय लोकहितासाठी होता. त्यांच्या आदर्शांवर चालणारे तरुणच महाराष्ट्राला अधिक बळकटी देतील. त्यांनी पुढे सांगितले की, शहरातील युवकांनी इतिहास जाणून घेत समाजकार्यात सहभागी व्हावे, हाच खरा त्यांचा अभिवादनाचा मार्ग आहे. मिरवणुकीत विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, महिला मंडळ, सामाजिक संस्था आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. संपूर्ण मिरवणुकीत ढोल-ताशांच्या गजराने आणि भगव्या झेंड्यांच्या लहरीने वातावरण दणाणून गेले. कार्यक्रमास नगरसेवक प्रकाश भागानगरे, गीतांजली काळे, मायाताई कोल्हे, निखिल वारे, बाळासाहेब पवार, परिमल निकम, ॲड. शिवाजी कराळे, सुरेश इथापे, चंद्रकांत गाडे पाटील, जयंत वाघ, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, महादेव काकडे यांच्यासह अन्य अनेक मान्यवर उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही प्रेरणादायी–भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, जालना येथे भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



महाराजांच्या शौर्य, धैर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा गौरव केला. भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन न्याय, समानता आणि स्वाभिमान यांवर आधारित राज्य उभारले. त्यांच्या कार्यातून देशभक्ती, शौर्य आणि संघटनशक्तीचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा. शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य आजही राष्ट्रनिर्माणासाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजहिताचे कार्य करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा, असेही त्यांनी यावेळी आवाहन केले. कार्यक्रमास भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शिवरायांना अभिवादन



जालना । प्रतिनिधी

श्री शिवछत्रपती सांस्कृतिक मंडळ जिल्हा जालना यांच्यावतीने गांधी चमन येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय शिवजयंती उत्सवाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी खासदार कल्याणराव काळे,आमदार अर्जुनराव खोतकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, सुभाष देविदान,रवी राऊत यांच्या सह अन्य जणांची उपस्थिती होती.

# भूम तालुक्यातील पराभवावर ठाकरे शिवसेनेने केले चिंतन

धाराशिव । प्रतिनिधी

भूम तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अधिकृत उमेदवारांना झालेल्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची चिंतन बैठक १७ रोजी भूम येथे पार पडली. पक्षाला धोका दिलेल्या, काम न केलेल्यांवर कारवाईचे संकेत देण्यात आले.

या बैठकीत पाच जिल्हा परिषद गट व दहा पंचायत समिती गणांतील उमेदवारांनी सहभाग घेतला. निवडणूक काळात स्वपक्षातील काही पदाधिकाऱ्यांनी विरोधकांशी हातमिळवणी करून अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम केल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करून आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत निष्ठावंत शिवसैनिकांना बळ देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीस आष्टा जि.प. उमेदवार जिन्नत सय्यद, वालवडच्या उर्मिला वनवे, सुकट्याच्या लक्ष्मी जानकर, पाथरूडचे शंकर नागरगोजे तसेच विविध पंचायत समिती गणांचे उमेदवार व पदाधिकारी उपस्थित होते. शिक्षक सेना राज्य संघटक कोहिनूर सय्यद, विधानसभाप्रमुख प्रल्हाद आडागळे, माजी शहरप्रमुख दीपक मुळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. याबाबत जिल्हासंपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी दूरध्वनीद्वारे सांगितले की, निवडणुकीत पक्षविरोधी काम करणाऱ्यांची माहिती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेना नेते अंबादास दानवे व इतर पक्षश्रेष्ठींना देण्यात येणार आहे. संबंधितांवर पदावरून पायउतार करण्यासह संघटनात्मक पातळीवर आवश्यक ती कारवाई केली जाईल. निष्ठावंत शिवसैनिकांना न्याय देण्याचा शब्दही त्यांनी दिला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत तालुक्यातील काही पदाधिकाऱ्यांनी उमेदवारांना वाऱ्यावर सोडल्यामुळे पराभव पत्करावा लागला, अशी खंत बैठकीनंतर अनेक शिवसैनिकांनी व्यक्त केली. पक्ष नेतृत्वाने तत्काळ दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा शिवसैनिक वेगळा विचार करण्याच्या मार्गावर जातील, असा सूर बैठकीनंतर उमटला.

# नंदू पाटील यांचे सामाजिक व राजकीय कार्यातून निराधाराला आधार देण्याचे काम

## स्वत:ची ओळख निर्माण करणारा युवा कार्यकर्ता

बदनापूर अंबड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष नारायणभाऊ कुचे साहेब व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके यांच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यातून घर निर्माण करणारा युवा कार्यकर्ता म्हणून अंबड तालुक्यातील रोहिलागड येथील भाजपचे कट्टर समर्थक नंदू भाऊ पाटील यांच्याकडे बघितले जाते. नंदू पाटील यांनी आजपर्यंत सर्वसामान्य गरीब व निराधार यांना आधार देण्याचं काम आमदार नारायण भाऊ कुचे साहेब यांच्या माध्यमातून केले आहे म्हणून निराधारचा नेता नंदू पाटील यांची अशी ओळख निर्माण झाली आहे यामुळे आता नंदू पाटील यांची कन्या कुमारी निकिता रोहिलागड पंचायत समिती गणा मधून निवडणूक लढणार आहे असा पाठिंबा त्यांना सर्वसामान्य नागरिकांमधून देण्यात येत आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना नंदू पाटील यांनी आपल्या कामाच्या जोरावर अनेकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.



विशेषतः नंदू पाटील यांना ग्रामीण भागातील सर्वसामान्य, कष्टकरी, शेतमंजूर यांच्या प्रश्नाची चांगलीच जाण असल्यामुळे त्यांनी आ. कुचे साहेब यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने, मोर्चे आणि निदर्शने करुन उपेक्षितांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरुन न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून त्यांच्याकडे संजय गांधी निराधार योजनेचे निवड सदस्य म्हणून नियुक्ती वर आहे या माध्यमातून त्यांनी निराधाराला न्यायालयाचे काम केले आहे. भारतीय जनता पक्षाने त्यांच्यावर मोठी जबाबदारी असून पक्ष बळकट करण्यासाठी ठिकठिकाणी शाखा स्थापन करुन त्या पदाला योग्य न्याय देण्याता प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामुळे अल्पावधीतच

वरिष्ठ नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण

नंदू पाटील यांचे वरिष्ठ नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत. घरात कोणताही राजकीय वारसा नसतांना नंदू पाटील यांनी आपल्या संघर्षशील शैलीने लोकप्रियता मिळविली आहे. जातीधर्मा पलीकडे जावून त्यांनी महापुरुषांचे विचार जयंती आणि पुण्यतिथीसारखे कार्यक्रम घेवून ते घरोघरी पोहचविण्याचे काम केले आहे. गोरगरिब, दलित, वंचित, उपेक्षित समाजाच्या सुखदुःखात सहभागी होवून त्यांचे अश्रू पुसण्याचे कामही त्यांनी केले असून या समाजाचे जीवनमान उंचवावे, यासाठी शासनाच्या विविध योजना त्यांच्या पदरात पाडून घेण्यासाठी, वेळप्रसंगी प्रशासनाशी भांडून न्याय मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न ते करीत आहेत. संजय गांधी निराधार समितीवर असताना अनेक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना मदतीचा हात दिला आहे. आरोग्य, शेती, शिक्षण आणि कर्मचारी या क्षेत्रातही त्यांचे योगदान राहिले आहे. त्यामुळेच नंदू पाटील म्हणजे आपला माणूस अशी त्यांच्याबद्दलची भावना जनमाणसात तयार झाली आहे. अशा या ध्येयवेड्या युवा कार्यकर्त्यास मनापासून सर्वसामान्य नागरिकांपासून ते निराधार महिलांचा आशीर्वाद आहे

## कन्या निवडणूक रिंगणात

अंबड तालुक्यातील रोहिलागड पंचायत समिती गणा मधून सर्वसामान्य व निराधाराला आधार देणारे नंदू पाटील व तसेच बदनापूर अंबड मतदार संघाचेआमदार नारायण कुचे यांचे कट्टर समर्थक एकनिष्ठ विश्वास कार्यकर्ता नंदू पाटील यांची कन्या पंचायत समिती निवडणूक मधून निवडणूक लढविणार आहे यासाठी निराधार यांचा आशीर्वाद त्या कन्याला असणार आहे म्हणून नंदू पाटील यांची कन्या निवडणूक लढणार आहे. नंदू पाटील यांनी निराधार महिलांना आधार देण्याचे काम बरेच वर्षापासून करीत आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांचे कोणतेही काम करून देण्यासाठी धडपड करून न्याय देण्याचे काम ते करीत आहे रोहिलगड सर्कल मधून सर्वसामान्य नागरिकाचे काम करण्यासाठी अबड शहरांमध्ये रात्रंदिवस मेहनत करीत आहे.

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**



# छत्रपतींच्या जयघोषाने जिल्हा दणाणला

## रक्तदान शिबिरासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने आणि अभिवादनाने केली शिवजयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सकाळपासूनच छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी झाली. या निमित्ताने बीड शहरासह जिल्हाभरात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. शिवजयंती निमित्त बीड शहरामध्ये आ. विजयसिंह पंडित, आ. संदीप क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन यांच्यासह विविध मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर जिल्हा भरात ठिकठिकाणी रक्तदान शिबिरे, मिरवणुका, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. शाळांमधूनही विद्यार्थ्यांनी मिरवणुका काढून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची उजळणी केली.







## शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन महापुजन

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज सकाळी ७.०० छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे शासकीय महापुजन करुन अभिवादन केले.

या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनित कॉवत, जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेस फडसे,तहसीलदार चंद्रकांत शेळके, आमदार संदिप क्षीरसागर, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

विविध शाळांची रॅली

छत्रपती शिवजंयतीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्यायभवन बीड येथुन सकाळी ९.०० वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात केली. रॅलीमध्ये आर्य भारत स्वयंसेवक, एनसीसी, एनएसएस पथक,स्काऊट गाईडचे विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. रॅली माने कॉम्लेक्स मार्गे मार्गस्थ होऊन यशवंराव चव्हाण नाटयगृह येथे समारोप झाला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा अधिकारी, शिक्षक, शिक्षिका, संबधित अधिकारी, कर्मचारी ,नागरिक उपस्थित होते.

## दर्याभवानी नाटकास बीडकरांचा उत्तम प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी ४० कलाकारांच्या सादरीकरण कार्यक्रमास बीडकरांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे शासकीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास (पान २ वर)

## माजलगाव वकील संघात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

बहुजन प्रतिपालक,रयतेचे राजे कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती येथील माजलगाव वकील संघात उत्साहात पार पडली.

यावेळी सदर जयंतीचे कार्यक्रमात ॲड.बि.एस.घनघाव यांनी यांनी शिवाजी महाराजांच्या विषयी गीत गायले तसेच ॲड. एस.डब्लू.साळवे साहेब यांची मुलगी सृष्टी तिने देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील मनोगत व्यक्त केले.तसेच बलराज शिंदे यांनी देखील शिवाजी महाराजांचे विचार मांडले सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपाध्यक्ष जाधव यांनी केले तर आभार



प्रदर्शन वकील संघाचे अध्यक्ष ॲड.एस.एम.सिद्दीकी यांनी मानले तर कार्यक्रम यशस्वी करण्यास वकील संघाचे सचिव ॲड.नारायण तेलगड यांनी मेहनत घेतली.सदरील कार्यक्रमास सिनियर ॲड,एस.के.गोंडे, ॲड. एस.ए. सुतळे, ॲड.टि. एन. कोल्हे, ॲड. आर. यु. पायाळ,ॲड.एम. टि.देशपांडे, ॲड.के.एन.डोंगरे, नाईकवाडे, ॲड.साबळे,ॲड.गरड,ॲड शिंदे,ॲड.खेत्री, ॲड.आडे, ॲड.मुंढे, ॲड.तेरकर, ॲड.मोरे,ॲड.तिडके यांच्यासाह वकील संघातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माजलगाव:- लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुंदरनगर ता. धारूर जि.बीड चे कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे सस्थापक राजाधिराज श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करनेत आली. प्रसंगी महाराजांचे प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, भागवतराव वगरे, नागोराव निर्मळ, अशोकराव पाटील, गनेश सोळंके, दत्तात्रय शेवाळे, नितिन सोळंके

## ज्ञानसागर गुरुकुलमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान व ज्ञानसागर गुरुकुल च्या वतीने ज्ञानसागर गुरुकुल मध्ये दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचा ज्ञानसागर गुरुकुलच्या शिक्षकांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन



सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानि मा. मुख्याध्यापक दिनकर सानप तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. मुख्याध्यापक डोके सर, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, जिव्हाळा अनाथ बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, इंदिरा प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कदम सर. प्रा. अविनाश सोनवणे, आदी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ◀◀ पान ३ वर

## ढेकनमोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्था यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन



करण्यात आले जयंतीनिमित्त तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाभावी उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास , हनुमान देवकते, बाबुराव तांदळे साहेब ग्रामसेवक, योगेश गणगे ग्रामसेवक तांडा, भगवान देवकते, भास्कर देवकते, बळीराम थापडे, सर्जेराव जाधव, नागेश शिंदे, नारायण देवकते, भारत देवकते, परमेश्वर थापडे (उपसरपंच), रणूसिंग ठाकूर, शुभांगी शिंदे, अंगणवाडीच्या शिंदे मॅडम, सुमन शिंदे, विनोद शिंदे, जगन्नाथ शिंदे, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## आष्टी तालुक्यात शिवजयंतीचा जल्लोष

### सामाजिक उपक्रमांनी उत्सवाला मिळाली अर्थपूर्ण दिशा

आष्टी । प्रतिनिधी

रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि सर्व धर्म-जातीत एकात्मता निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आष्टी तालुक्यात अभूतपूर्व उत्साह आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. तालुक्यातील शहरांपासून ते खेडोपाड्यांपर्यंत शिवभक्तीचा जल्लोष उसळला होता. भगवे ध्वज, ढोल-ताशांचा गजर, शिवगर्जना आणि सामाजिक उपक्रमांमुळे संपूर्ण तालुका शिवमय झाला.

कडा कारखान्यात अभिवादनाने जयंतीची सुरुवात

आष्टी तालुक्यातील कडा कारखाना परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जयघोषात जयंती उत्सवाची सुरुवात करण्यात आली. शिवभक्तांनी ''जय भवानी, जय



शिवाजी''च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सकाळपासूनच नागरिक, विद्यार्थी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पांढरी गावात सणासारखा उत्सव

तालुक्यातील पांढरी गावात शिवजयंती एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी करण्यात आली. प्रत्येक घरात पुरणपोळीचा स्वयंपाक करण्यात आला, नागरिकांनी नवे कपडे परिधान केले आणि घराघरांवर भगवे ध्वज फडकत होते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी शिवजयंतीचा उत्सव आपला समजून सहभाग नोंदविला.

एसटी महामंडळाचा उत्साही सहभाग

राज्य परिवहन विभागाच्या (एसटी महामंडळ) वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. पत्रकार बांधव, कर्मचारी आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत ◀◀ पान ३ वर

## धनराज मुंडे यांच्याकडून स्व.गणेश डोंगरे कुटुंबीयांना आर्थिक मदत

### माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविला सामाजिक उपक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील ऊसतोड कामगार स्व. गणेश डोंगरे यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटात मदतीचा हात पुढे करण्यात आला. माजी खासदार डॉ. प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त इतरत्र अवाढव्य खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत भाजप युवा नेते तथा कोठारबनचे ग्रामपंचायत सदस्य धनराज मुंडे यांनी डोंगरे कुटुंबीयांना आर्थिक मदत प्रदान केली.**

ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूमुळे



कुटुंबाचा कर्ता पुरुष हरपल्याने कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करत गरजू कुटुंबाला आधार देण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी बोलताना धनराज मुंडे म्हणाले, ना. पंकजाताई मुंडे यांची शिकवण आहे की, गरजूंना नेहमी मदत करा. या शिकवणीतून वाढदिवस हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. डोंगरे कुटुंबावर आलेले दुःख मोठे आहे. अशा वेळी आपण सर्वांनी एकत्र येत मदतीचा हात पुढे करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. पुढील काळातही गरजू आणि वंचित घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील. असे मत धनराज मुंडे यांनी व्यक्त केले. या सामाजिक उपक्रमामुळे सामाजिक कार्याची जाणीव आणि संवेदनशीलता अधोरेखित झाली. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, रोहन डोंगरे सर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डोंगरे कुटुंबीयांना धीर देत भविष्यातही आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून सामाजिक ऐक्य आणि जबाबदारीची भावना जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

## रक्तदान करत शिवजन्मोत्सव साजरा

### दिंद्रुडच्या खोलेश्वर परिवाराचा आदर्श उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

रक्ताचा तुटवडा भरून निघण्यासाठी खारीचा वाटा उचलत सलग सहाव्या वर्षीही शिवजन्मोत्सवाचा सण रक्तदान करून साजरा करण्याचा संकल्प दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराने पूर्ण केला. गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९६ व्या शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन मराठा सेवा संघ प्रदेश संघटक पुरुषोत्तम जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, व उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी,प्रमुख पाहुणे योगेश शेजुळ, नारायण झोडगे, विलास



कोळपे, मुख्यकार्यकारी अधिकारी विलास पारेकर सह दिंद्रुड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक या प्रसंगी उपस्थित होते. शिबिरात २४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ओमप्रकाश जी शेटे यांची या रक्तदान शिबीरास सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची मुर्ती देऊन सत्कार करण्यात आले. खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या ◀◀ पान ३ वर

## शिवसेनेच्या वतीने रविवारी नोकरभारती मार्गदर्शन मेळावा



### बीड जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपनीत नोकरीची संधी – उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर या भागात असणाऱ्या टाटा मोटार, वोरफूल, बजाज, फियाट, टाटा बॅटरी आटोमोबाईल, इलेक्ट्रिक, आय टी सेक्टरशी निगडित असणाऱ्या नामांकित कंपनीत प्रशिक्षण देऊन नोकरीं ची संधी मिळणार आहे.बीड जिल्हातील बेरोजगार १० वी पास व त्यावरील शिक्षण असणाऱ्या युवक-युवतीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नोकरभारती मार्गदर्शन मेळावा आयोजित केल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

सदरील मेळावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यालय, बस्थानका मागे डी. पी रोड ◀◀ पान ३ वर

## नेकनूर येथील मूकबधिर शाळेत शिवजयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

दि. १९ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी नेकनूर येथील मूकबधिर शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर हे उपस्थित होते . प्रमुख पाहुणे श्री राखुंडे सर हे उपस्थित होते सर्व मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एक अत्यंत देदीप्यमान व्यक्तिमत्व आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते.शिवाजी महाराजांनी शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांचे राज्य हे केवळ सत्तेसाठी नव्हते तर ते रयतेचे



राज्य होते. महिलांचा सन्मान आणि आदर करणे हे त्यांचे कडक नियम होते. शेतकऱ्यांच्या हिताची त्यांनी नेहमी काळजी घेतली. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी केवळ कर्तुत्वावर माणसांची पारख केली. मासाहेब जिजाऊंनी संस्कार केले म्हणून शिवाजी महाराज घडले आणि त्यांनी स्वराज्य घडवले. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याबद्दल श्रीमती खराटे मॅडम व कुलकर्णी सर, गिराम सर यांनी आपल्या मनोगत मधून थोडक्यात माहिती सांगितली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री तांबिले सर यांनी केली. सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती लोखंडे मॅडम यांनी मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थित हा कार्यक्रम संपन्न झाला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# सुनेत्रा पवारांचं किल्ले शिवनेरीच्या साक्षीने पहिलं भाषण ; बोलताना झाल्या भावुक

**शिवनेरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यासह देशभरात उत्साहात पार पडत आहे. या निमित्ताने शिवनेरी किल्ल्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रात्रीपासूनच शिवनेरी गडावर नागरिकांची मोठी गर्दी बघायला मिळत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे शिवनेरी गडावर कार्यक्रमासाठी उपस्थित आहेत. ढोल ताशाच्या गजर शिवनेरी किल्ल्यावर पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा जोजावत जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी शिवनेरीवरती राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार (ऊळच् डींपर्शीीर झुरुी षळीीी ाशिशलह) यांनी पहिल्यांदाच शासकीय कार्यक्रमात आपलं मनोगत व्यक्त केलं आहे. यावेळी सुनेत्रा पवार भावूक झाल्याचंही दिसून आलं.




राज्यातील शेतकरी, कष्टकरी जनतेला सुखी-समाधानी ठेव, छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेल्या वाटेवर चालायचं बळ आम्हा सर्वांना दे, असं साकडं मी आई शिवाई देवीच्या चरणी घालते. यापूर्वी अनेकदा शिवछत्रपती महाराज आणि जिजाऊ माँसाहेबांना वंदन करण्यासाठी शिवनेरी किल्ल्यावर येण्याचं भाग्य मला लाभलं होतं. पण आजचा दिवस माझ्यासाठी अत्यंत वेगळा आणि जबाबदारीची जाणीव करुन देणारा आहे. मी नुकतीच उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ज्या कठीण प्रसंगात मी शपथ घेतली, त्यावेळी माझ्या डोळ्यांसमोर जिजाऊ माँसाहेब उभ्या होत्या. जिजाऊ माँसाहेबांनी केवळ शिवरायांना जन्म दिला नाही, त्यांना स्वराज्याचा ध्यास दिला, संस्कार दिले आणि संकटाशी दोन हात करण्याची जिद्द दिली. तीच तुमची आमची प्रेरणा आणि आधार आहे. शिवरायांच्या जन्मभूमीवर आज बोलताना माझ्या अंगावर काटा आला आहे. छत्रपती शिवरायांनी मावळ्यांना दिलेली स्वराज्याची शपथ आठवली. आपण सगळेजण शिवरायांचे मावळे आहोत, हीच भावना आज माझ्या मनात आहे. ज्या विचारांवर आदरणीय दादांनी आयुष्यभर वाटचाल केली, तोच शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा मी कधीही सोडणार नाही, हा शब्द मी या पवित्र भूमीवर शिवजयंतीच्या दिवशी मी तुम्हाला देते. सुनेत्रा पवार यांनी बोलताना म्हटलं की, ज्या कठीण प्रसंगी मी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली त्यावेळी माझ्या नजरेसमोर जिजाऊ होत्या. अजित पवारांनी आयुष्यभर ज्या फुले शाहू आंबेडकर व विचारांनी वाटचाल केली तो विचार मी आयुष्यात कधीही सोडणार नाही हे तुम्हाला मी आश्वासन देते. याच ठिकाणी अजित दादांनी अनेकदा भाषण दिलेले आहे. दादांना या शिवनेरी किल्ल्याबद्दल जिव्हाळा तर होताच पण या शिवनेरी किल्ल्याचे सुशोभीकरण करण्यासाठी ते प्रयत्नशील होते. अजित पवारांनी मागील अर्थसंकल्पात देखील आग्रा, संगमेश्वर, रायगड, वढू बुद्रुक या ठिकाणी कामे सुरू केली होती. या प्रत्येक ठिकाणी भावी पिढीला प्रेरणा मिळणार आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून प्रत्येक घटकाची काळजी घेण्यासाठी कटिबद्ध असेल, अशी भावना सुनेत्रा पवारांनी व्यक्त केली आहे.

**बोलताना कंठ दाटून आला, म्हणाल्या, 'मी ज्या कठीण प्रसंगात...'**

**मंदार गोंजारी, एबीपी माझा, पुणे**

## दहावीच्या परीक्षेसाठी 'हायअलर्ट'! ५५४ केंद्रांवर सीसीटीव्हीच नाहीत; मंडळाचा मोठा निर्णय



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता दहावीच्या परीक्षेवर वॉच ठेवण्यासाठी २७१ भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतच्या सूचना शाळांना देण्यात आल्या होत्या. प्रत्यक्षात मात्र अद्यापही ५५४ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत. १९१ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. त्यातील ४२ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले नाहीत. त्यामुळे या केंद्रांवरील शिक्षक, कर्मचारी यांची अदलाबदल केली जाणार आहे. मागील वर्षातील परीक्षेत ३१ परीक्षा केंद्रांवर कॉपीचे गैरप्रकार आढळून आले होते.

त्यामुळे या परीक्षा केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्यात आली आहे. कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत परीक्षा काळातील संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, यादृष्टीने राज्य मंडळामार्फत भरारी पथके, बैठी पथके नियुक्ती केली आहेत. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवावी लागणार आहेत. याशिवाय संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरप्रकारांच्या प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी राज्यातील ९ हजार ७८८ दिव्यांग विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. यात पुणे - १३३८, नागपूर - १२९५, छत्रपती संभाजीनगर - ९२३ , मुंबई - २६०२, कोल्हापूर - ८८४, अमरावती - १०५८, नाशिक - ८०५, लातूर - ५५६, कोकण - ३२७ यांप्रमाणे विभागनिहाय दिव्यांग विद्यार्थ्यांचा त्यात समावेश आहे. पुणे विभागातील दोन दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लॅपटॉप व अन्य सॉफ्टवेअरचा वापर करण्याची मुभा देण्यात येणार आहे.

## झेडपीत ५ तर पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्य नेमा; आमदार शंकर मांडेकरांची राज्य सरकारकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

ग्रामीण राजकारणातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करून, जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्य नेमण्याची तरतूद करावी, अशी मागणी भोर-मुळशी-राजगडचे आमदार शंकर मांडेकर यांनी राज्य सरकारकडे केली आहे. या मागणीमुळे ग्रामीण भागातील सक्रियपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकवेळा समाजकार्यात आणि पक्ष संघटनेत उल्लेखनीय योगदान देणारे कार्यकर्ते मुख्य प्रवाहापासून दूर राहतात. अशा अभ्यासू आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याची मागणी आमदार मांडेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. आमदार मांडेकर यांनी या संदर्भात राज्य सरकार आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा सुरू केला असून, या मागणीवर सरकार काय सकारात्मक निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जर सरकारने ही कायदेशीर सुधारणा केली, तर प्रशासनाला अनुभवी लोकांचा सल्ला मिळेल आणि विकासकामांना अधिक गती येईल. तसेच, यामुळे शासनाविषयीचा सामान्य कार्यकर्त्यांमधील विश्वास अधिक दृढ होईल, असेही त्यांनी म्हटले आहे.



## शेजाऱ्याकडे भांडी मागायला गेले अन् जीव गमावला; धक्कादायक घटनेने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली परिसरात नातेवाईकांकडे ठेवलेल्या गृहोपयोगी वस्तू, तसेच भांड्याच्या वादातून झालेल्या बेदम मारहाणीक एकाचा मृत्यू झाला. या प्रकरणी दाम्पत्याला अटक झाली आहे. भास्कर मोहन राठोड (वय ५८, रा. कोलदंडी, जिंतूर, परभणी) यांचा खून झाला असून आनंद रवींद्र वर्मा (वय २६), शीला आनंद वर्मा (वय २४, दोघे रा. आव्हाळवाडी, वाघोली, अहिल्यानगर रस्ता) यांना अटक झाली.

राठोड हे मूळचे परभणीतील जिंतूरचे रहिवासी आहेत. ते कामानिमित्त पुण्यात आले होते. वाघोलीतील आव्हाळवाडी भागात त्यांनी भाडेतत्त्वावर खोली घेतली होती. राठोड यांच्याशेजारी वर्मा दाम्पत्य राहायला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी गृहोपयोगी साहित्य आणि भांडी वर्मा दाम्पत्याकडे दिली होती. १६ फेब्रुवारी रोजी राठोड यांनी भांडी परत मागितली. त्यावरून झालेल्या वादातून दाम्पत्याने बेदम मारहाण केली. मारहाणीत राठोड हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपरीक्षक शहादेव शहाळे तपास करत आहेत.

## कात्रज खुनाची मिस्ट्री सुटली! रिक्षाचालकासह सहाजण अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज भागातील मांगडेवाडीजवळ मृतावस्थेत सापडलेल्या महिलेच्या खुनाचा उलगडा झाला असून रिक्षाचालकासह सहाजणांना अटक केली आहे. खूनानंतर पकडले जाण्याची भीतीने रिक्षाचालकाने रिक्षाच्या छतावरील हूड बदलले होते. या प्रकरणी रिक्षाचालक केशव कमलेश चौधरी (वय २०, रा. भारतनगर, कात्रज), सोनू लक्ष्मण पवार (वय १८),

अब्दुल मोहंमद शेख (वय २३), महादेव अर्जुन व्होरडे (वय ४०), साई अमित पुजारी (वय १९), सोहेल हनिफ खान (वय २१) यांना अटक झाली आहे. साई पुजारी, सोनू पवार हे सराइत आहेत. मांगडेवाडीतील खाणीत एका ४० वर्षीय महिलेचा मृतदेह पोलिसांना १० फेब्रुवारी रोजी सापडला होता. सुरुवातीला भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद झाली. गुन्हे शाखा याचा समांतर तपास करत होते. मात्र, धागेदोरे सापडले नाहीत. कात्रज घाटासह परिसरातील ९७ ठिकाणच्या सीसीटीव्हीचे चित्रीकरण पोलिसांनी तपासले होते. चित्रीकरणात रिक्षा आढळून आली होती. या रिक्षाचा क्रमांकावरुन तपास करण्यात आला.

रिक्षा चालक चौधरीला ताब्यात घेतल्यावर त्याने साथीदारांच्या मदतीने महिलेला खाणीत ढकलून दिल्याची कबुली दिली. पकडले जाण्याची भीतीने त्याने रिक्षाचे हुड बदलले होते. पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, सहायक निरीक्षक अमोल रसाळ, उपनिरीक्षक संजय जाधव, विजय पवार, विशाल दळवी, प्रवीण उत्तेकर, साधना ताम्हाणे, शंकर कुंभार, विनोद चव्हाण, योगेश मांढरे, संदीप शिर्के यांनी ही कामगिरी केली.कात्रजमध्ये १० फेब्रुवारी रोजी महिलेने रिक्षा थांबविली. तिने कात्रज परिसरातील एका हॉटेलजवळ सोडण्यास सांगितले. रिक्षाचालक चौधरीचे साथीदार अब्दुल शेख, सोनू पवार हे रिक्षात होते. शेख आणि पवार यांनी मद्यप्राशन केले होते. महिलेला सोडण्याचा बहाणा करुन आरोपींनी तिला मांगडेवाडी परिसरात नेले. आरोपींनी महिलेवर अतिप्रसंग केल्याची शक्यता आहे. महिलेने विरोध केल्यानंतर तिला खाणीत ढकलून दिल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.

## एमसीए व एमएचएमसीटी सीईटी नोंदणीस २३ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

पुणे। प्रतिनिधी

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मास्टर ऑफ कॉम्प्युटर प्लिकेशन (एमसीए) व मास्टर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी (एमएचएमसीटी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश नोंदणीस २३ फेबुवारीपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती सीईटी सेलच्या वतीने देण्यात आली आहे.

एमसीए या अभ्यासक्रमास ५० हजार ९६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे, तर एमएचएमसीटी या अभ्यासक्रमास ५२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. एमसीए या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ३० मार्चला होणार आहे, तर एमएचएमसीटी या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २५ मार्च रोजी होणार आहे. मागील वर्षी एमसीए सीईटीत ५६ हजार २५७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. तर, एमएचएमसीटी सीईटीत८० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संगणकाधारित पद्धतीने ऑनलाईन घेतल्या जातील.

## पुणेकरांना मोठा दिलासा! ५ टक्के मिळकतकर वाढ महापालिकेने फेटाळली

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाने मिळकतकरात प्रस्तावित केलेली पाच टक्के करवाढ बुधवारी झालेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेने एकमताने फेटाळली. यामुळे पुणेकरांवरील करवाढीचे संकट सध्या तरी टळले आहे. महापालिका निवडणुकीनंतर निर्विवाद बहुमताने सत्तेवर भारतीय जनता पक्ष या करवाढीबाबत काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, भाजपने पुणेकरांना दिलासा देत करवाढ फेटाळण्याची भूमिका घेतली. मोठ्या प्रमाणावर मिळकत कर थकबाकी असल्याने त्याबाबत सविस्त अहवाल सादर करण्याचा आदेश यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिला. महापालिकेच्या २०२६-२७ च्या अंदाजपत्रकाची तयारी सुरू असून, २० फेब्रुवारीपूर्वी मिळकत कराबाबत निर्णय घेणे बंधनकारक आहे.

दोन आठवड्यांपूर्वी प्रशासक म्हणून जबाबदारी सांभाळताना आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मिळकतकरात पाच टक्के करवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रशासनाने



सुरूवातीला दहा टक्के करवाढ केली होती. नंतर, स्थायी समितीत प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांनीच गुपचूप ५ टक्के दरवाढ केली होती. त्यामुळे, प्रशासनाच्या कारभारावर टीका केली जात होती. महापालिकेने गेल्या दहा वर्षांपासून करवाढ केलेली नाही. उत्पन्न आणि खर्च यातील तफावत कमी करण्यासाठी करवाढ आवश्यक असल्याचे मत आयुक्त राम यांनी व्यक्त केले होते. त्यानुसार प्रशासनाने सुरुवातीला दहा टक्के मिळकतकर वाढीचा प्रस्ताव मांडला होता.

पुणे महापालिका मालमत्ता कर.

मात्र, स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव दहा टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आला होता. दरम्यान, सर्वसाधारण सभेत मिळकतकर विभागाच्या कारभारावर तीव्र टीका करण्यात आली. करवाढ करण्याची वेळ प्रशासनावर का आली, अधिकारी व कर्मचारी कर वसुलीसाठी पुरेसे प्रयत्न का करत नाहीत, असा सवाल नगरसेवकांनी उपस्थित केला.

मोठ्या प्रमाणावर मिळकतकराची थकबाकी प्रलंबित असून, त्याचा सविस्तर अहवाल सभागृहासमोर सादर करण्याचे आदेश महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिले. यावेळी समाविष्ट गावांमधील थकीत मिळकत कराबाबतही निर्णय होत नसल्याची तक्रार करण्यात आली. अधिक दराने कर आकारला जात असून, समावेशनानंतर अपेक्षित सुविधा मिळालेल्या नाहीत. समाविष्ट गावांतील कर आकारणीचा पुनर्विचार करावा, पाच पट मिळकतकराची पद्धत बदलावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते निलेश निकम, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे गटनेते काका चव्हाण, अजित घुले, हरीदास चरवड, सुभाष नाणेकर यांनी केली. कर वाढविण्याऐवजी प्रशासनाने या विभागाचे काम अधिक प्रभावी तसेच प्रामाणिकपणे केल्यास महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशा सूचना सभागृहनेते गणेश बिडकर यांनी केल्या.

## ओतूरच्या गाढवेपटात बिबट मादी जेरबंद

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या बिबट्याच्या हालचालींवर वनविभागाने वेळीच नियंत्रण मिळवले आहे. गाढवपट येथे लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात गुरुवारी (दि. १९) पहाटे सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास बिबट मादी जेरबंद झाली.

ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल श्रीमती एस. एम. बुट्टे, वनरक्षक के. एस. खरोडे (उदापूर) तसेच वनकर्मी किसन केदार यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून जेरबंद बिबट मादीला सुरक्षितरीत्या माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात आले आहे. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार पकडलेल्या बिबट मादीचे वय सुमारे १ ते १.५ वर्षे आहे. अलीकडे परिसरात पाळीव प्राण्यांवर हल्ल्यांच्या घटना व बिबट्याच्या हालचालींची नोंद होत असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. वनविभागाच्या या कारवाईमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना, रात्रीच्या वेळी एकटे बाहेर न पडणे, लहान मुलांवर लक्ष ठेवणे व पशुधन सुरक्षित ठिकाणी ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## तहसीलदार आणि निबंधक बडतर्फ? मुंढव्यातील जमीन घोटाळा अधिकाऱ्यांच्या अंगाशी

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा येथील सरकारी जमीन गैरव्यवहारप्रकरणी निलंबित पुणे शहर तहसीलदार सूर्यकांत येवले व नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना बडतर्फ करण्याची शिफारस अतिरिक्त सचिव विकास खारगे समितीने केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. मुंढवा येथील बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या मालकीची ४० एकर जमीन तीनशे कोटी रुपयांत विकल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या व्यवहारात अमेडिया एंटरप्राइझेस या कंपनीचे भागीदार दिग्विजयसिंह पाटील आणि कुलमुखत्यारधारक शीतल तेजवानी यांच्यात हा व्यवहार झाला. या व्यवहाराची




दस्तनोंदणी करताना अनेक नियमांना बगल देण्यात आल्याचे उघड झाले आहे.

त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने महसूल विभागाचे अतिरिक्त सचिव खारगे यांची समिती नेमली होती. समितीने यासाठी या व्यवहारातील तथ्य पडताळून आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालात या दोन्ही अधिकाऱ्यांनी गंभीर चुका केल्याचे समितीकडून सांगण्यात आले. मात्र, अहवाल सादर करण्यापूर्वीच येवले आणि तारू या अधिकाऱ्यांना राज्य सरकारने राज्यघटनेच्या ३११ व्या कलमाचा विशेषाधिकार वापरत बडतर्फीची नोटीस बजावली होती. येवले यांनी त्या नोटिशीला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये (मॅट) आव्हान दिले होते. मॅटमध्ये याची सुनावणी १३ जानेवारीला झाली. त्यात येवलेच्या वकिलांनी चौकशी न करता नोटीस बजावल्याचे सांगितले. मात्र, ३११ कलमानुसार चौकशी न करताच बडतर्फ करण्याचा अधिकार राज्य सरकारला असल्याने मॅटने ही याचिका निकाली काढली. त्यामुळे येवलेच्या बडतर्फीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याच पद्धतीने मुंढवा जमीन गैरव्यवहारात दस्त नोंदणीची प्रक्रिया पार पाडणारे निलंबित सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांनाही बडतर्फीची नोटीस बजावली आहे. आता या दोन्ही अधिकाऱ्यांना थेट बडतर्फीचे आदेश देण्यात येतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## वित्तीय समितीला 'तिलांजली' द्या! महापालिकेत नगरसेवक आक्रमक; समिती बरखास्त करण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

करोना संकटाच्या काळात महापालिकेच्या अनावश्यक खर्चाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने महापालिकांना वित्तीय समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. मात्र, करोना संकट संपल्यानंतरही या समितीमुळे आर्थिक शिस्त लागत असल्याने तत्कालीन महापालिका आयुक्तांनी ही समिती कायम ठेवली होती. आता महापालिकेच्या पहिल्याच मुख्य सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी ही समिती बरखास्त करण्याची मागणी केली आहे. या समितीचे कारण पुढे करत महापालिका प्रशासनच विकासकामांना खोडा घालत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. दरम्यान, यासंदर्भात माहिती घेऊन अहवाल सादर



केला जाईल, असे स्पष्टीकरण आयुक्त नवल किशोर राम यांनी सभागृहात दिले आहे.

मुख्य सभेच्या चर्चेत भाजपचे नगरसेवक पृथ्वीराज सुतार यांनी वित्तीय समितीचा मुद्दा उपस्थित केला. पूर्वी अंदाजपत्रकानुसार कामे केली जात होती. मात्र, सध्या प्रशासनाचा कल कामे अडविण्याकडे असल्याचा आरोप त्यांनी केला. विविध विकासकामांना मंजुरी देताना अडथळे आणले जातात. कोविड संक्रमणाच्या काळात स्थापन करण्यात आलेल्या वित्तीय समितीची आवश्यकता नसताना तिची मंजुरी बंधनकारक करण्यात आल्याने वेळ वाया जातो आणि कामांना विलंब होतो, असे त्यांनी नमूद केले. सभागृह अस्तित्वात आल्याने ही समिती बरखास्त करण्याची मागणी त्यांनी केली.

या वेळी धीरज घाटे यांनीही समिती कोविड काळात स्थापन करण्यात आली होती, त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत तिची आवश्यकता नसल्यास तत्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनी प्रशासक काळात वित्तीय समिती असणे योग्य होते. मात्र, आता स्थायी समिती व सर्वसाधारण सभा अस्तित्वात असल्याने स्वतंत्र वित्तीय समितीची गरज नसल्याचे सांगितले, तर काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी बीपीएमसी कायद्यानुसार सर्वसाधारण सभा सर्वोच्च असून, आर्थिक विषयक निर्णय स्थायी समितीत घेतले जातात. त्यामुळे दोन स्वतंत्र केंद्रांची आवश्यकता नसून, वित्तीय समिती तातडीने बर्खास्त करावी, अशी भूमिका मांडली.